एखाद्या देशाच्या प्रगतीसाठी सर्वांना शिक्षण देणे फार महत्त्वाचे असते. हे शाहू महाराजांच्या लक्षात आले होते ही दृष्टी निर्माण होण्यासाठी ते जेव्हा इंग्लंडमध्ये शिकायला गेला तेव्हा त्या ठिकाणी त्यांना ज्या ज्या गोष्टी लक्षात आल्या त्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुत्वा, न्याय आणि शिक्षणाचे महत्त्व हे कळले होते. खऱ्या अर्थाने सामूहिक शिक्षणाची सुरुवात भारतात ब्रिटिशांनी केली. सर्व जातींना शिक्षण देण्याचे श्रेय त्यांनाच जाते.1854 मध्ये त्यांनी पहिल्यांदा कायदा केला. व सर्वांना शिक्षण उपलब्ध करून दिले. त्यांनी शाळा काढल्या आणि सर्वांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. आणि झिरपण्याच्या सिद्धांताचा पुरस्कार केला. त्यांना असे वाटत होते की भारतातील उच्च जाती खालच्या जातींना शिक्षण देईल, पण तसे झाले नाही. पण भारतातील जातीव्यवस्था आणि त्यातील ही उच्च जाती ह्या अस्पृश्य आणि शूद्रांना आपल्या सोबत बसायला मज्जा करत होते. ही गोष्ट त्या काळातील इंग्रजांच्या लक्षात आले होते. त्या अडचणीवर मात करणे आवश्यक होते. म्हणून इंग्रजांनी आपल्या शाळेमध्ये सर्वांना प्रवेश दिला तरीही त्या ठिकाणी जाती व्यवस्था पाळी जात होती. याच काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी शाळा काढली. त्यांना असे लक्षात आले की भारतामध्ये शिक्षण जर आपल्याला वाढवायचे असेल तर पहिल्यांदा जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी झिरपण्याच्या सिद्धांताला विरोध केला. त्यानंतर शाहू महाराजांनी ही जबाबदारी पार पाडली. त्यांनी आपल्या संस्थांमध्ये अनेक शाळा काढल्या, एवढेच नाही तर जातवार शाळा काढल्या जातवार हॉस्टेल निर्माण केले. आणि शिक्षण मात्र थांबू दिले नाही हे सर्वात महत्त्वाचे ! कारण इंग्लंड मधील उदार दृष्टिकोन त्यांच्यासमोर होता आणि शिक्षणामुळेच माणूस हा समजदार, तार्किक होतो. आणि आपल्या देशाचा विकास करणार आहोत हे त्यांना माहीत होते. शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण त्यांच्या जन्माच्या पर्यंत त्यांच्या संस्थानांमध्ये 1851 शाळा होत्या. त्यात त्यांनी 95 शेळयांची भर घातली. महाविद्यालय काढले, अनेक शिक्षण संस्थांनी सढळ हाताने मदत केली.उद्योजकनिक, औद्योगिक, व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षणाची सोय केली. आपले शैक्षणिक धोरण निर्माण करताना त्यांनी ज्या गोष्टीला महत्त्व दिले. ते पाहू शैक्षणिक धोरण आखताना शाहू महाराजांची दृष्टी शाहू महाराजांसमोर सर्व जातींच्या लोकांचा विचार होता. त्यांनी शाळा काढताना असा कधीही विचार केला नाही की कोणती जात शिकली पाहिजे किंवा नाही. त्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळावे मोफत आणि सक्तीचे मिळावेत त्यासाठी आपल्या राज्यामध्ये धोरण आणले. स्त्रियांच्या

शिक्षणाची सोय केली. एवढेच नाहीतर पोस्ट निर्मिती केली होती. शैक्षणिक दृष्ट्या या भागातले मागासलेले लोक लवकर लवकर समोर जावे आणि आपला विकास करावा, आपल्या विकासासोबत देशाचा विकास करावा, स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी भाग घ्यावा, इतकेच नाही तर ज्या गोष्टीमुळे समाजामध्ये अंधविश्वास निरक्षरता दारिद्र्य शोषण निर्माण होते, त्याविरुद्ध सुद्धा त्यांनी लढा द्यावा हा त्यांचा उद्देश होता. महाराजांना समाजाची आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती माहीत होती. त्यामुळे त्यांनी या दृष्टिकोनातून धोरण आखतानाकाटेकोरपणे समाजाचा कसा विकास होईल याकडे जास्त लक्ष दिले.

पूर्वी वतन पद्धती होती ती बंद केली आणि वेतन पद्धती सुरू केली. कारण वतन हे जातीवर आधारित होते. वेतन देणे आणि माणसाला माणूस म्हणून निर्माण करणे हा त्यामागचा उद्देश होता. ती पद्धती सुरू करून त्यांनी आपल्या संस्थानांमध्ये नवीन पायंडापाडला. इंग्रजांच्या काळामध्ये शाळेवरती देखील ठेवण्यासाठी पंचपद्धती होती पण ती तेवढी चांगली नव्हती. शाहू महाराजांनी पंचपदीला बळ दिले आणि त्यांच्यावर जबाबदारी सोपवली आणि शाळेचा दर्जा वाढावा हा त्यामागचा उद्देश होता. इतकेच नाही तर शाहू महाराजांनी शिक्षक कमी पडू नये यासाठी अध्यापक विद्यालयाची स्थापना केली आणि कमीत कमी सहा महिने त्यामध्ये ट्रेनिंग घेऊन आणि जास्तीत जास्त शिक्षक निर्माण हवे यासाठी त्यांनी प्रयत्न केला. शिक्षक कमी पडल्यानंतर त्यांनी दुसरी महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे आपल्या संस्थांमध्ये जे नोकर आहे, त्यांना जास्तीचा वेळ देऊन आपल्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून नेमणूक केली. त्यामागचा उद्देश हाच की कोणीही शाळेमध्ये शिक्षिका विना राहू नये कारण का शिक्षक जर शिकवत नसेल तर विद्यार्थी राहणार नाही इतकेच नाही तर विद्यार्थी टिकावे म्हणून त्याला भाकरी देण्याची सोय सुद्धा केली. इतकेच नाहीतर मुलींना शिष्यवृत्ती देण्याचा प्रयत्न केला. मुलींनी नेहमी शाळेत यावे यासाठी त्या भागामध्ये प्रबोधन केले. जनजागृती केली. शिक्षणात सुसूत्रता निर्माण व्हावी म्हणून शिक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती केली. त्याच्या हाताखाली तीन शिक्षण अधिकारी नेमले. ज्यामुळे शिक्षणावर व शाळेचा दर्जावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. शाहू महाराजांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यामागचा कारण हे होतं की जर शिक्षणात सक्ती नसेल तर व्यक्ती ते शिक्षण घेणार नाही. आणि शिक्षणघेणार नाही, तर त्याचा विकास होणार नाही. त्याच्या मध्ये एक प्रकारे विकसित दृष्टिकोन निर्माण होणार नाही. म्हणून त्यांनी पहिले पासूनच आपल्या संस्थानांमध्ये सक्तीच्या शिक्षणाचे धोरण राबवले. ज्या ज्या शाळा त्यांनी निर्माण केल्या होत्या त्या सर्वांमध्ये त्यांनी आपल्या राज्यात कायदा केला आणि सक्तीचे शिक्षण निर्माण केले. शिक्षकांना चांगला पगार देण्याचे कार्य त्यांनी केले. प्रत्येक ठिकाणी आपण पोहोचू शकत नाही यासाठी त्यांनी अनेक लोकांना शाळा काढण्यासाठी त्यांना जागा देण्याचे प्रयत्न, त्यांना अनुदान देण्याची प्रयत्न, त्या काळात त्यांच्या संस्थानांमध्ये त्यांनीकेला.

पूर्वी स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, पण इंग्रज आल्यानंतर हळूहळू स्त्रिया शिकू लागल्या. शाहू महाराजांच्या संस्थानांमध्ये स्त्रियांनी शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी स्त्रियांच्या वेगळ्या शाळा निर्माण केल्या.तोउद्देश सफल होतनाही कारण मुली शाळेमध्ये येत नव्हत्या. त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष त्या त्या भागामध्ये स्त्रियांच्या बाबतीत जाणीव निर्माण करण्यासाठी प्रत्येक स्त्रीला त्या त्या भागात पाठवून त्यांच्यामार्फत मुलींना शिक्षणाबद्दलची जाणीव जागृती निर्माण केली. असा करणारा हा राजा म्हणण्यापेक्षा आपल्याला एक सामाजिक कार्यकर्ता आणि परिवर्तनवादी विचारवंत जास्त जाणवतो. मुलीच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी आपल्या संस्थानांमध्ये राजाराम महाविद्यालयाची स्थापना केली. जर मुलगी आणखी समोर शिकत असेल तर तिला उच्च शिक्षण देण्याची पूर्ण सोय त्यांनी आपल्या संस्थानांमध्ये केली. इतकेच नाही तर शिक्षणा च्या चळवळीत आपल्या विधवा सुनेला सामावून

घेतले. राज परिवारात मुलींना शिक्षणाचा विरोध होता. तो त्यांनी झुगारून दिला आणि आपल्या विधवा सुनीलच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा केला. एकूणच त्यांची भूमिका ही उदारवादी सर्वांना विकासाला पोषक होती.

1922 पर्यंत त्यांनी एकूण 33 शाळा काढल्या आणि त्यामध्ये 2271 मुली शिक्षण घेऊ लागल्या. एकूण विचार केला तर हे फार मोलाचे होते. त्या काळामध्ये इतर संस्थानामध्ये अवस्था अत्यंत वाईट होती. त्या काळातले इतर राजे आपल्या मनोरंजनामध्ये आणि आपल्या अय्याशी मध्ये आपला वेळ घालत होते. त्यापैकी बडोदा, मैसूर आणि करवीर हे संस्थान मात्र शिक्षणाच्या बाबतीत अग्रेसर होते.

**सारांश**:

स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार केला तर शाहू महाराजांचे कार्य हे अतिशय महत्त्वाचे होते. ज्यावेळेस अंधकारमय जग असताना शिक्षणाची सुरुवात करून आपल्या संस्थांमध्ये अशा प्रकारची व्यवस्था करणारा तो प्रगतिशील राजाच नाही तर एक लोकशाहीचा अत्यंत कर्तव्यदक्ष समाज सुधारक व समाज परिवर्तक असा व्यक्ती होता. त्या काळात भारतामध्ये 650 पेक्षा जास्त संस्थाने होती आणि त्यातील फक्त मैसूर, बडोदा आणि करवीर संस्थानअशी होती की, ज्या ठिकाणी शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार वेगाने झालेला होता. यामागचे कारण की त्या काळातील हे राजे असले तरीही त्यांच्यावरती एक प्रकारे उदारमतवाद,मानवतावाद, उदार दृष्टिकोन, इंग्रजी शिक्षणाची भारतामध्ये मुहूर्तमेढ रोवून, सर्वसामान्य लोकांना दिशा देणे, त्यांना विकास करणे, मुलींचा विकास करणे, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. आणि तो त्यांनी आपल्या जन्मभर 46 वर्षाच्या आयुष्यामध्ये पूर्ण केला. हे त्यांचे कार्य दीपस्तंबासारखे होते. म्हणून त्यांच्या कार्याचा आढावा घेताना असे म्हणावे लागते की, त्यांचा दृष्टिकोन लोकशाहीला पोषक असणारा राजा असा होता. त्यांच्या एकूण कार्यांचा आढावा घेता येईल. लोकशाहीला पोषक कार्य करणे हे त्या काळातील अतिशय महत्त्वाची गोष्ट शाहू महाराजांनी केली, म्हणून शाहू महाराज एक करते सुधारकच नाही तर एक परिवर्तनवादी राजाच नाही तर एक महामानव असं म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ:**


1) जयसिंगराव पवार - शाहू महाराजांचा इतिहास
2) धनंजय कीर- शाहू महाराज सत्व आणि विचार
3) नानासाहेब लठ्ठे-शाहू महाराज जीवन आणि कार्य
4) मंजुश्री पवार-राजर्षी शाहू अँड ब्रिटिश पॅरामाउंट इन इंडिया

# छत्रपती शाहू महाराजांचे आरक्षण धोरण : एक अभ्यास

**डॉ. एस. पी. घायाळ**

प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**प्रस्तावना -**

वर्षानुवर्षे भारतीय समाजजीवनाचा अविभाज्य घटक असलेली सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी आरक्षण धोरण अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. आरक्षण धोरणाचे जनक कोल्हापूर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आरक्षण धोरण आधुनिक भारताच्या इतिहासात अत्यंत क्रांतिकारक, प्रेरणादायी ठरले आहे. 19 व्या शतकात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी बहुजन, स्त्री वर्गाच्या शिक्षणाची दारे खुली केली. विद्ये विना मती गेली असे सांगत महात्मा फुले यांनी शिक्षण हेच बहुजनांच्या विकासाचे मुख्य साधन आहे असे सांगून अनंत अडचणीवर मात करत पुण्यात मुलींसाठी शाळा काढल्या. शिक्षण घेतलेल्या बहुजनांच्या साठी नोकरीत हक्काच्या जागा मिळाल्याशिवाय बहुजनांच्या एकूण ज्ञानाचा वापर होणे शक्य होईल हे छत्रपती शाहू महाराज यांनी ओळखले. आपल्या संस्थानात आरक्षण उपलब्ध करून देऊन सर्वांना प्रगतीच्या, विकासाच्या मार्गावर आणण्याची संधी उपलब्ध करून दिली. फुले, शाहू, आंबेडकर हे भारतीय सामाजिक, धार्मिक परिवर्तनाचे प्रणेते आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत कायद्यानुसार आरक्षण धोरण अवलंबले याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांना द्यावे लागते. आपले राजकीय अधिकार, राजकोष याचा सकारात्मक वापर करून शिक्षणासह आरक्षणही सुरू केले. छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे स्मरण म्हणून त्यांचा जन्म दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो. पुढीलप्रमाणे त्याचा विचार करू.

**उद्दिष्टे -**

1. छत्रपती शाहू महाराज यांच्या आरक्षण धोरण समजून घेणे.
2. स्वातंत्र्यपूर्व काळात आरक्षण धोरण स्वीकारल्यामुळे समाजात झालेल्या सकारात्मक बदलांचा विचार करणे.
3. मागासलेल्या घटकांची उन्नती करण्यात छत्रपती शाहू महाराज यांचे कार्याचे योगदान समजून घेणे.
4. भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्य घटनेत केलेली तरतूद समजून घेणे.

**गृहितके -**

1. छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात आरक्षण धोरण सर्वप्रथम सुरू केले.
2. संस्थानातील मागास घटकांचे जीवनमान सुधारण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले.
3. अस्पृश्यता निवारण करताना केवळ सामाजिक समता निर्माण करू असे म्हणून चालत नाही तर तशी तरतूदही करावी लागते.
4. छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने बहुजनांचे राजे होते.

**तथ्य संकलन -**

प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी द्वितीयक साधनांचा आधार घेतला जाणार आहे. गरजेनुसार इतर आधुनिक तंत्रांचा

आधार घेतला जाईल. इंटरनेट वरील महत्त्वाच्या माहितीचा आधार घेऊन लेख अधिक अद्यावत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रमुख संज्ञा -**

छत्रपती शाहू महाराज यांचे आरक्षण धोरण, अस्पृश्यता निवारण, बलुतेदार मुक्ती, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट, मागासवर्गांना समानतेची संधी, सामाजिक न्याय दिवस.

**विषय प्रवेश -**

1. **आरक्षणाची उपयुक्तता -**

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने शाहूंनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५०% शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. 26 जुलै हा दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो.

'अस्पृश्यतेचे उच्चाटन हे शाहूंनी आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. महार-वतन खालसा करून महारांची वेठबिगारीतून आणि गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींची 'हजेरी' पद्धतीतून मुक्तता केली. फासेपारधी, कोरवी, माकडवाले यांसारख्या भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणार कायदा जारी केला.'[1] मागास घटकाच्या उन्नतीसाठी त्यांना शिक्षणाची दारे खुली करून देणे महत्त्वाचे होते. त्याचप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी त्यांना एका पानवट्यावर पाणी भरणे यासारख्या सामाजिक समतेच्या कृतीतून समानतेचा संदेश देणे आवश्यक होते. या बाबी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात केल्या. त्याही पुढे जाऊन शिक्षित बहुजनांना आपल्या संस्थानात सरकारी नोकरीत आरक्षण देऊन त्यांच्या एकूणच जगण्याला प्रगतीच्या मार्गावर आणण्याचे महान कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले आहे. महाराजांनी दलितांना तलाठ्याच्या सन्मानाच्या जागा दिल्या. त्याचप्रमाणे फासेपारधी जमातीतील लोकांना सरकारी सेवेत रुजू करून घेतले, इतकेच नव्हे तर त्यांच्या हजेरी लावण्याच्या पद्धतीला बंद करून त्यांना आपले व्यक्तिगत अंगरक्षक म्हणूनही नेमले. सामान्य जनतेच्या, बहुजनांच्या कल्याणासाठी स्वतः जातीने प्रयत्न करणे याचे अतिशय जिवंत उदाहरण कृतीतून छत्रपती शाहू महाराज यांनी घालून दिले आहे. वरील काही त्याचीच अतिशय महत्त्वाची उदाहरणे आहेत असे आपल्याला म्हणता येईल.

2. **छत्रपती शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट -**

आरक्षण धोरणाचे जनक छत्रपती शाहू महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट हा आरक्षण धोरणातील अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे असे आपल्याला म्हणता येईल. मुळात 'फुले, शाहू, आंबेडकर' या सामाजिक उन्नतीच्या महान सुधारकापैकी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांचा एकमेकांशी जवळचा संबंध होता. छत्रपती शाहू महाराजांनी वेळोवेळी डॉ. आंबेडकर यांनाही मदत केलेली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय राज्यघटनेमध्ये आरक्षण कायद्याने सर्वसामान्यांसाठी दिले गेले. याचे श्रेयही छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याला द्यावे लागते. म्हणून छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट ही दलितांच्या सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे असे आपल्याला येथे मान्य करावे लागते. 'याच सुमारास (1919) शाहूंची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत बाबासाहेबांबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा 'खरा पुढारी' मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला.'[2] मुळात बहुजन, दलित, आदिवासी लोकांच्या उन्नतीचे कार्य हे कोण्या एकाचे कार्य नसून ही सामूहिक, सामाजिक जबाबदारी आहे. यासाठी समाजाचा कळवळा असलेल्या समान विचार आणि कृती असलेल्या लोकांनी एकत्र येणे अत्यंत गरजेचे असते. छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांचे एकत्रित प्रयत्नही याचे अत्यंत महत्त्वाचे उदाहरण आहे असे आपल्याला म्हणता येईल. वर नमूद केल्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला आहे. तसेच वेळोवेळी शक्य तेवढी मदतही केली आहे. एकूण आरक्षण धोरण छत्रपती शाहू महाराजांनी राबवले याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात कायमच आदर राहिला आहे, हे राज्यघटनेमध्ये आरक्षणाचे धोरण पाहता सहज लक्षात येते.

### 3. महाराजांचे आरक्षण धोरण -

तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात उच्चवर्णीयाचे असलेले प्रस्थ विचारात घेता छत्रपती शाहू महाराज यांनी 50 टक्के आरक्षण धोरण राबविणे हे अतिशय क्रांतिकारक पाऊल होते. आरक्षण धोरण राबविणे त्या काळात सहज सोपे नव्हते, हेही इथे विचारात घ्यावे लागते. आपल्या पदरी असलेल्या उच्चवर्णीयांकडून होणारा विरोध मोडून काढणे आणि परंपरेने दबलेल्या, पिचलेल्या, पापभीरु मागास लोकांच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे अशा दुहेरी बाजूने छत्रपती शाहू महाराज यांचे आरक्षण धोरण महत्त्वाचे राहिले आहे, हे इथे स्वीकारले पाहिजे. '26 जुलै १९०२ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना 50 टक्के राखीव जागा राहतील अशी घोषणा केली. त्याची त्वरित अंमलबजावणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविले. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात असा निर्णय घेणारे ते एकमेव संस्थानिक आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात शाहू महाराजांचेच मागासवर्गीयांना नोकऱ्या 50% जागा राखीव ठेवण्याचे धोरण व्ही. पी. सिंग या पंतप्रधानांनी राबविण्याचा निर्णय घेतला.'[3] छत्रपती शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना 50 टक्के राखीव जागा देण्याची घोषणा केली. पुढे आपल्या संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबतचा अहवालही मागवून घेतला. एकूण केवळ कोल्हापूर संस्थान, महाराष्ट्र राज्य इथेच नव्हे तर सबंध भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळात अशा पद्धतीचा निर्णय घेणारा संस्थानिक म्हणून छत्रपती शाहू महाराज यांचा विचार करावा लागतो. पुढील काळात भारतीय पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी राबवलेले धोरण संबंध देशासाठी राबवले, यावरूनही छत्रपती शाहू महाराज यांच्या आरक्षण धोरणाचे महत्त्व अधोरेखित करता येते. जोपर्यंत समाजातील बहुसंख्य बहुजनांच्या, दलितांच्या जगण्यास प्रगतीच्या मार्गावर आणता येत नाही तोपर्यंत देशाची प्रगती झाली असे म्हणता येत नाही. एकूण भारत हा कृषिप्रधान आणि खेड्यात राहणारा देश

असल्यामुळे खेड्यात राहणारा मागास, अज्ञानी, दलित समाज जोपर्यंत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत नाही तोपर्यंत सबंध देशाची प्रगती झाली असे म्हणता येत नाही. हे अतिशय महत्त्वाचे सूत्र छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात राबवले आणि त्याचाच पुढील काळात देशभरामध्ये स्वीकार केला गेला हे इथे आपल्याला मान्य करावे लागते.

छत्रपती शाहू महाराज तत्कालीन इतर संस्थानिक पेक्षा वेगळे होते. आपल्या ज्ञान, सत्ता, अधिकार आणि संपत्तीचा त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी सकारात्मक वापर केला आहे. 'इसवी सन १८९४ मध्ये म्हणजे शाहू महाराज सत्तेवर आले तेव्हा संस्थानात मागासवर्गीयांचे प्रशासकीय सेवेत 5.63 एवढे प्रमाण होते. 1922 मध्ये हेच प्रमाण 62.11 एवढे वाढले. मागासलेल्या वर्णचा अर्थ, ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण वजा करून सर्व वर्ण असा समजावा. राजर्षी शाहूंच्या या क्रांतिकारी निर्णयास न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, शि. म.परांजपे नची केळकर लोकमान्य टिळक यांचा विरोध होता.'[4] तत्कालीन समाजसुधारकांचा विचारवंताचे विरोध पत्करून छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात आरक्षण धोरण सुरू केले. पूर्वी केवळ 5% च्या आसपास असलेले मागासवर्गीयांचे आरक्षण 1920 च्या आसपास 60% च्या वर पोहोचले. यावरून छत्रपती शाहू महाराज आरक्षणासाठी किती आग्रही होते आणि त्यांचे नियोजन किती काटेकोर होते याचा अंदाज येतो. तत्कालीन न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, लोकमान्य टिळक यासारख्या सामाजिक, राजकीय विचारवंतांनी विरोधक केलेला असतानाही छत्रपती शाहू महाराज यांनी सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी आरक्षणाचे क्रांतिकारक पाऊल उचलले आहे हे नाकारता येत नाही.

**निष्कर्ष -**

छत्रपती शाहू महाराज केवळ बोलके सुधारक नव्हते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे कृतीशील, कर्ते सुधारक म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागतो. येथे त्यांच्या आरक्षण धोरणाच्या संक्षिप्त अध्ययनानंतर हाती आलेले निष्कर्ष नोंदवता येईल. 'शाहू महाराजांचा २६ जून हा जन्मदिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. त्यादिवशी सार्वजनिक कार्यक्रम होतात.'[5] छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा हा उचित गौरव आहे असे म्हणता येईल.

1. छत्रपती शाहू महाराज हे भारतीय आरक्षण धोरणाचे जनक आहेत.
2. तत्कालीन कोल्हापूर संस्थान आणि भारतातील इतरही भागात आरक्षणाचे धोरण राबविणारे ते पहिले संस्थानिक होते.
3. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेत आरक्षणाबाबत जी उपाययोजना केली आहे त्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याला द्यावे लागते.
4. भारतातील बहुसंख्य बहुजन, मागास वर्गातील जनतेच्या उन्नतीसाठी आरक्षण धोरण उपयुक्त ठरले आहे.
5. छत्रपती शाहू महाराज यांच्या क्रांतिकारक कार्याचे स्मरण म्हणून 26 जुलै सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो.
6. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्याचे नैसर्गिक अधिकार प्राप्त करून देणे एक संस्थानिक म्हणून आद्यकर्तव्य आहे याचे स्मरण छत्रपती शाहू महाराज यांना होते.

7. समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य या मानवी मूल्यांची जडणघडण छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कृती आणि वृत्तीतून केली आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी आपले राजकीय अधिकार, सत्ता, संपत्ती याचा सकारात्मक वापर करून बहुजनांचे सर्वांगीण हीत जोपासण्याचे कार्य केले आहे. तसेच महाराजांनी राबवलेले आरक्षण धोरण हे तत्कालीन भारतीय समाजातील अतिशय क्रांतिकारी पाऊल होते हे इथे मान्य करावे लागते. जातीयता, धर्मांधता, धर्मभोळेपणा, मागासनेपणा हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य होते तर आधुनिक काळात समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, ज्ञान, प्रगतीची समान संधी या मानवी मूल्यांची सुरुवात हे आधुनिक काळाची वैशिष्ट्ये होते, हे इथे मान्य करावे लागते. यासाठी छत्रपती शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या महान क्रांतिकारकांनी प्रयत्न केले आहेत हे विसरता येत नाही.

**संदर्भ -**


1. https://vikaspedia.in
2. तत्रैव
3. प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ - आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारक - कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद - प्र. आ. जुलै 2018 - पृ. 104.
4. तत्रैव - 104.
5. https://mwikipedia.org

# "राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीयांविषयक धोरण"

**प्रा. रामराव धेनू चव्हाण**

समाजशास्त्र विभाग प्रमुख, शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर ( महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

भारतीय समाजात अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यापैकी छत्रपती शाहू महाराज हे केवळ बोलकेच नव्हे तर कर्ते समाजसुधारक होते. त्यामुळे महाराष्ट्राचे थोर समाजसुधारक व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अत्यंत मोलाची अशी भूमिका बजावली आहे. शाहू महाराजांना बालपणापासून लाभलेली संस्काराची शिदरी फार विलक्षण व प्रेरणादायी होती. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजात जागृती निर्माण करून त्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष व सत्ताधीश एक राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. विचारपूर्वक स्वकारलेल्या सामाजिक व राजकीय तत्वाच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्विकारता या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कोल्हापूर संस्थांनापुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतातही लोकप्रिय बनले. त्यामुळे एक आदर्श राजा व बहुजन समाजाचा नेता म्हणून त्यांची असलेली लोकप्रियता शेवटपर्यंतच कायम राहिली. राजर्षी शाहू महाराज एक राजा नव्हे तर ते एक मोठे समाजसुधारक व क्रांतिकारक होते. त्यांनी आपल्या राज्यकारभाराच्या माध्यमातून भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून सामाजिक बदल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल. या प्रयत्नाच्या माध्यमातूनच शाहू महाराजांनी विविध क्रांतिकारक निर्णयामुळे अनेक पुरोगामी कायदे निर्माण केले. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुष प्रधान असल्यामुळे समाजात पुरुषांना श्रेष्ठ तर स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ समजला जातो. त्यामुळे स्त्रीयांवर अनेक प्रकारची बंधने लादली जात होती. स्त्रियांसाठी अनेक अनिष्ट प्रथा समाजात होत्या. त्यात बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी, सतीप्रथा, बहुपत्नीत्व, nकेशव केशवपन स्त्रीशिक्षण बंदी, पडदा पध्दती व देवदासी आशा अनेक वाईट प्रथा प्रचलित होत्या. त्यामुळे शाहू महाराजांच्या काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती दयनीय स्वरुपाची होती. स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात अन्याय व अत्याचार होत होते. तसेच समाजाच्या व कुटुंबाच्या माध्यमातून स्त्रियांचे शोषण करण्यात येत होते. त्यावेळी स्त्रीला समानतेची वागणूक मिळावी, त्यांना त्यांचे नैसर्गिक हक्क आणि अधिकार मिळावेत. तसेच समाजात व कुटुंबात होणाऱ्या अन्याय व अत्याचारापासून स्त्रियांची कायमची मुक्तता व्हावी. यामुळे शाहू महाराजांनी स्त्रियांच्या संरक्षणासाठी वेगवेगळया कायद्याची निर्मिती केली. हे कायदे तत्कालीन समाजातील स्त्रीयांच्या दृष्टीने फार हितकारक आहेत. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रीयांविषयक धोरणाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न खालीलप्रमाणे केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

०१) शाहू महाराजांच्या काळातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

०२) शाहू महाराजांच्या काळातील स्त्री संरक्षण विषयक कायद्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्य :**

०१) शाहू महाराजांच्या काळात स्त्रियांवर अनेक प्रकारची सामाजिक बंधने होती.

०२) शाहू महाराजांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी विविध कायदे केले आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**शाहू महाराजानी केलेले स्त्री विषयक कायदे:**

भारतीय समाजात पुरुष प्रधान संस्कृतीमुळे पुरुषांना श्रेष्ठ तर स्त्रियांना कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला. म्हणून स्त्रिया उपेक्षित आणि दूर्बल मानल्या जात होत्या. तत्कालीन समाजात स्त्रियांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार होत असल्यामुळे त्यांची सामाजिक स्थिती फारच हलाखीची होती. त्यावेळी स्त्रियांची सामाजिक स्थिती फारच बिकट असल्याचे शाहू महाराजांच्या लक्षात आले होते. म्हणून महिलांवरील अन्याय व अत्याचार समुळ नष्ट करण्याचे कार्य महात्मा फुलेंच्या बरोबरच शाहू महाराजांनी देखील केलेले आहेत. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात स्त्री शिक्षणाबरोबरच स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे अमलात आणून स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार थांबविण्यासाठी वास्तविक प्रयत्न केले आहेत.

**०१) विधवा पुनर्विवाहचा कायदा (१९१७) :**

भारतीय समाजव्यवस्थेत विधवा स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार नव्हता. विधवा स्त्रीने केशवपन करावेत, अशी वाईट प्रथा तत्कालीन समाजात होती. त्यामुळे स्त्रियांना दु:खी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते. एखाद्या विधवेने पुनर्विवाह करण्याचे धाडस दाखवले, तर त्यास समाजमान्यता व कायद्याचीही मान्यता नव्हती. म्हणजे असा विवाह बेकायदेशीर असून त्यापासून जन्माला येणारी संतती अनौरस मानली जात होती. त्यावेळी शाहू महाराजांनी या अन्यायकारक रुढीला हादरा देण्यासाठी १९१७ च्या जुलैमध्ये आपल्या कोल्हापूर संस्थानात विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा तयार केला. तसेच या कायद्यानुसार विधवांच्या पुनर्विवाहास येणाऱ्या अनेक अडचणी दूर करण्यात आले होते.

**०२) आंतरजातीय विवाहाचा कायदा (१९१९) :**

शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात सर्व प्रथम आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा १२ जुलै १९१९ रोजी अमलात आणण्याचे मोठे धाडस केले. या कायद्यानुसार हिंदू व जैन या दोन धर्मांतील लोकांना जातीनिर्बंध न पाळता सदरहू दोहोंपैकी आपापल्या कोणत्याही धर्माच्या व्यक्ती सोबत विवाह करण्याची परवानगी दिली गेली होती. तसेच या कायद्यानुसार विवाहासाठी पुरूषाचे वय १८ वर्षे तर स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहिजे असा नियम करण्यात आला. कारण तत्कालीन समाजात बालविवाहाचे प्रमाण जास्त होते. त्यास आळा बसला. त्याचबरोबर या कायद्याप्रमाणे १८ पुर्ण झालेल्या स्त्रीला आपला जीवनसाथी स्वईच्छेने निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला. यावरून असे लक्षात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जाती निर्मुलनासाठीचा लढा यापुर्वीच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात लढलेला आहे.

**०३) घटस्फोटाचा कायदा (१९१९) :**

शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात याच सुमारास म्हणजे ०२ ऑगस्ट १९१९ रोजी स्त्रियांसाठी घटस्फोटाचा कायदा केला. या कायद्यानुसार घटस्फोटानंतर स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर तिच्या अन्न, वस्त्र व निवाराच्या खर्चाची योग्य व्यवस्था कशी केली जाईल याकडे विशेष लक्ष ठेवून या कायद्यात तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल तर त्याच्या ताब्याबाबत, पोटगीबाबत व शिक्षणाची व्यवस्थाही या कायद्याने केली आहे. त्याचबरोबर या कायद्यामुळे काही जातींमध्ये जातपंचायतीला घटस्फोटाचे (काडीमोड करणे) असलेले अधिकार काढून घेतले. त्यामुळे स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांना या कायद्याने मान्यता मिळाली.

**०४) वारसा हक्काचा कायदा (१९२०) :**

शाहू महाराजांनी १९२० च्या जानेवारीत तयार केलेल्या वारसा हक्क कायद्याच्या माध्यमातून शुद्रांची अनौरस संततीला व ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वरिष्ठ वर्णांची अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसा हक्कांतील फरक काढून टाकला व सर्व वर्णाच्या अनौरस संततीला आपापल्या आई-वडिलांच्या संपत्तीतील वारसा हक्क प्राप्त करून दिला. याच कायद्यातील दुसरे कलम पतीत स्त्रियांच्या उद्धाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते.

**०५) देवदासी प्रतिबंधक कायदा (१९२०) :**

भारतीय समाजव्यवस्थेत देवाच्या नावाने मुली सोडण्याच्या प्रथेतून देवदासी प्रथा सुरू झाली. ही प्रथा शाहू महाराजांच्या काळातही होती. यातूनच पुढे देवदासीचा एक वर्ग निर्माण झाला होता. या देवदासीमध्ये मुरळी, जोगतीन, भावीण असा स्त्रियांचा एक प्रकारे दूर्दैवी वर्गच निर्माण झाला होता. अस्पृश्यतेप्रमाणेच देवदासी प्रथा हा हिंदू समाजाला लागलेला कलंक होता. समाजातील हा कलंक दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा पास केला. तसेच शाहू महाराजांनी देवदासी प्रतिबंधक कायद्यानुसार देवदासी म्हणून सोडलेल्या सर्व स्त्रियांना त्यांच्या आई-वडिलांच्या संपत्तीतील सर्व हक्क मिळवून देऊन तिचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहे.

**०६) पडदा पध्दतीचा निषेध :**

या काळात महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांत विशेषतः राजघराणी, मराठा सरदार व वतनदार घराणी त्यांच्यामध्ये पडदा पध्दती अस्तित्वात होती. ही पध्दत स्त्रियांचे स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपणारी एक रूढी आहे, असे स्पष्ट मत शाहू महाराजांनी मांडले होते. अनेक स्त्रियांनी आपल्या कोल्हापूर संस्थानाचा गाडाही संभाळलेला आहे. म्हणून ही सर्व कामे पडद्यात राहून होणार नाहीत. त्यामुळे शाहू महाराजांनी तत्कालीन समाजात स्त्रियांसाठी असलेल्या पडदा पध्दतीस जाहीरपणे विरोध केला असून स्त्रियांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा होता.

**निष्कर्ष :**

1. शाहू महाराजांनी विधवा स्त्रियांना कायद्याने पुनर्विवाह करण्याचा अधिकार मिळवून दिलेला आहे.
2. शाहू महाराजांनी आपल्या काळात स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण केले होते.
3. शाहू महाराजांनी तत्कालीन समाजात स्त्रियांनाही आंतरजातीय विवाहा करण्यासाठी प्रोत्साहन दिले.
4. शाहू महाराजांच्या प्रयत्नामुळेच स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळाल्याचे आढळून आले आहे.

5. समाजातील पुर्वपार चालत आलेल्या स्त्रियांच्या बाबतीत वाईट असलेली देवदासी प्रथा कायदेशीरपणे बंद करण्यात आली.
6. शाहू महाराजांनी तत्कालीन समाजात स्त्रियांवर असणारे अनेक सामाजिक निर्बंध घालण्यासाठी विविध कायद अमलात आणून स्त्री पुरुष समानता आणली आहे.

**सारांश :**

आपल्या भारत देशातील पुरुष प्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रियांवर अनेक प्रकारच े अन्याय व अत्याचार होत होते. त्यामुळेच स्त्रीया उपेक्षित, असहाय्य व परावलंबी बनलेल्या होत्या. विशेष महत्वाचे म्हणजे तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांच्या संदर्भात वाचा फोडण्याचे महत्त्वाचे काम शाहू महाराजांनी केलेले आहे. म्हणूनच स्त्रीयांविषयक कायद्यामुळे समाजातील अनिष्ट प्रथा बंद केलेल्या दिसून येतात.

**संदर्भ सूची :**


1. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, २०१७
2. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती-एक समाज क्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८
3. डॉ. अनिल शिंगारे, महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४\
4. डॉ. एस. एस. गाठाळ, महाराष्ट्रातील समाजसुधारक: विचारधारा व कार्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१४
5. प्रा. आर. डी. राठोड, राजर्षी शाहू महाराज: सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती, अरूणा प्रकाशन, लातूर, २०१७

# महान तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक राजा : छत्रपती शाहू महाराज

डॉ. मारोती दशरथ कसाब

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात इसवी सन १६७४ साली रयतेचे स्वराज्य सम्राट छत्रपती शिवरायांनी स्थापन केले. त्यानंतर अवघ्या पन्नास वर्षात स्वराज्याचे रूपांतर पेशवाईत झाले आणि ज्या लोकांनी शिवरायांच्या नेतृत्वाखाली लढून स्वराज्य निर्माण केले होते त्या मांग, महार, बेरड, रामोशी, धनगर, कुणबी, साळी, माळी, कोळी आदी मावळयांच्या छळाला पारावार उरला नाही. १८१८ मध्ये दुसरा बाजीराव पेशवा इंग्रजांसमोर निभाव न लागल्यामुळे पळून गेला आणि पुण्यासह मराठी प्रदेशावर इंग्रजी राज्य स्थापित झाले.

इंग्रजी राज्याच्या ऐन मध्यावर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्मलेल्या शाहू छत्रपतींनी महाराष्ट्रात पुन्हा एकदा शिवरायांच्या स्वप्नातील स्वराज्य निर्माण केले , ही एक ऐतिहासिक अशी सामाजिक क्रांती होती.

२६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथे शाहूराजांचा जन्म झाला. जयसिंगराव घाटगे आणि राधाबाई यांचे हे प्रथम अपत्य. त्यानंतर ३ जानेवारी १८७६ रोजी बापूसाहेब हे शाहूंचे धाकटे बंधू जन्माला आले. दरम्यान कोल्हापूरच्या गादीवर असलेले छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांचे उत्तराधिकारी म्हणून यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांना दत्तक घेण्यात आले. महाराज चौथे शिवाजी यांना दरबारातील कारस्थानी अधिकाऱ्यांनी मनोरुग्ण ठरवून त्यांची रवानगी अहमदनगरच्या किल्ल्यात केली होती. तिथेच डिसेंबर १८८३ मध्ये महाराजांचा करुण अंत झाला. त्यानंतर १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांचे दत्तक विधान आणि राज्यारोहण समारंभ झाला आणि शाहू छत्रपती असे त्यांचे नामाभिधान करण्यात आले.

या काळात इंग्रजांनी अनेक संस्थाने खालसा केली होती. मात्र कोल्हापूरचे संस्थान ते खालसा करू शकले नाहीत. पुण्याच्या पेशव्यांचाही डोळा या संस्थानावर होता. पण त्यांचीही डाळ शिजू शकली नव्हती. या संस्थानावर इंग्रजांचे वर्चस्व होते. शाहू राजांच्या दत्तक विधानाला आणि राज्यारोहणाला इंग्रज सरकारकडून मान्यता घ्यावी लागली. याप्रसंगी इंग्रजांनी काही अटीही घातल्या होत्या. त्यानुसारच छत्रपती शाहू महाराज हे राजकोटला शिक्षणासाठी गेले. तेथील राजकुमार महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला आणि त्याच वर्षी २० मार्च १८८६ रोजी जयसिंगराव घाटगे म्हणजेच शाहुराजांचे जनक पिताजी यांचे निधन झाले. १८८९ मध्ये राजकोटहून शिक्षण घेऊन, शाहू महाराज कोल्हापुरला आले आणि २२ मे रोजी स्टुअर्ट मिटफोर्ड फ्रेजर यांची शाहूंचे शिक्षक व पालक म्हणून नेमणूक करण्यात आली. फ्रेजर हे अत्यंत बुद्धिमान आणि प्रागतिक, सुधारणावादी, मानवतावादी विचारांचे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाहूंचे पुढील शिक्षण धारवाड येथे सुरू झाले. याच काळात शाहू महाराजांनी 'भारत दर्शन' दौरा पूर्ण केला. गुरु फ्रेजर आणि सहाध्यायी मित्रांसोबत शाहूराजांनी संपूर्ण उत्तर भारत आणि दक्षिण भारताचा अभ्यास दौरा केला.१ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी शाहूराज यांचा विवाह संपन्न झाला. १० मार्च १८९४ रोजी शाहुराजांना पहिले कन्यारत्न प्राप्त झाले. राधाबाई उर्फ अक्कासाहेब यांचा जन्म झाला. त्याच वर्षी २ एप्रिल रोजी शाहूराजांनी गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्याकडून राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतली आणि लगेच प्रजेला उद्देशून पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला.

आपले राज्य प्रजेच्या हितासाठी कसे चालवायचे याची खूणगाठ महाराजांनी आपल्या मनात आधीच पक्की बांधली होती. १४ एप्रिल १८९४ रोजी शाहूराजांनी' दिवाणी न्यायालयाने शेतकऱ्यांच्या गुरांचा लिलाव करू नये' , असा आदेश जारी केला. संपूर्ण राज्याची पाहणी स्वतः फिरून केली. पन्हाळा पेट्यात राहणाऱ्या अनेक आदिवासी जमातींना स्वतः भेटून त्यांच्या अडचणी व गाऱ्हाणी ऐकली. या काळात राज्यकारभारात संपूर्णपणे ब्राह्मणांचे एकजात वर्चस्व होते. त्यामुळे सर्वसामान्य बहुजनांच्या हिताला बाधा पोहोचत होती. हे ओळखून महाराजांनी पहिल्यांदा भास्करराव जाधव या सत्यशोधकाची आपल्या सरकारमध्ये 'सहाय्यक सरसुभा' म्हणून नेमणूक केली. आणि राज्यकारभारात बहुजनांसह दलितांचाही सहभाग वाढवला. जनतेला छत्रपती शिवरायांची प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन, समाधीची दुरुस्ती करण्याची मोहीम हाती घेतली. राज्यकारभारात स्त्रियांनाही संधी मिळावी म्हणून महाराजांनी १ सप्टेंबर १८९५ रोजी रखमाबाई केळकर यांना 'स्त्री शिक्षण खात्याची अधीक्षक' म्हणून नियुक्ती दिली. १५ एप्रिल १८९९ रोजी महाराजांना दुसरे पुत्ररत्न प्राप्त झाले. प्रिन्स शिवाजी यांचा जन्म झाला. त्याच वर्षी वेदोक्त प्रकरण घडले. राज्यकारभाराची सूत्रे हाती घेताच शाहू महाराजांनी जनतेच्या हितासाठी अनेक कायदे करायला सुरुवात केली. त्यामुळे सत्तेचा मलिदा लाटणाऱ्या भट पुरोहितांचा पोटशूळ उठला आणि १८९९ मध्ये ब्रिटिश राजकीय प्रतिनिधी कर्नल रे यांच्यावर विषप्रयोग करण्यात आला. या प्रकरणात जाणीवपूर्वक शाहू महाराजांना गोवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करण्यात आला.

समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, ही गोष्ट महाराजांनी जाणली होती. म्हणून त्यांनी आपल्या राज्यात प्रत्येकाला शिक्षण मिळाले पाहिजे ,असे धोरण आखले. कोल्हापूर येथे त्यांनी १८ मे १९०१ रोजी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' सुरू केले. महाराजांना अडचणीत आणण्यासाठी राज पुरोहितांनी वेदोक्त प्रकरणी त्यांच्यावर खटला भरला. मात्र १६ एप्रिल १९०२ रोजी न्यायालयाकडून महाराजांना वेदोक्ताचा संपूर्ण अधिकार बहाल करण्यात आला. त्यानंतर महाराजांनी राज पुरोहितांचे इनाम आणि अधिकार पूर्णपणे गोठविले. महाराजांचे हे वैशिष्ट्य लक्षात घेतले पाहिजे की एकीकडे राज्यकारभारातील हितशत्रूंशी लढत असतानाच ते जगाचाही अभ्यास करीत होते. आपल्या प्रजेला अधिकाधिक आधुनिक करण्याचा प्रयत्न करीत होते.नवे जग पाहण्याची, विविध माणसांना भेटण्याची, नवे समजून घेण्याची त्यांची जिज्ञासा अफाट होती.

सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहण समारंभाला हजर राहण्यासाठी महाराज १७ मे १९०२ रोजी मुंबईहून इंग्लंडला रवाना झाले आणि २ जून १९०२ रोजी ते लंडनमध्ये पोहोचले. इंग्लंड आणि युरोपचा दौरा करून जवळ-जवळ तीन-साडेतीन महिन्यानंतर महाराज ३१ ऑगस्ट १९०२ रोजी कोल्हापूरमध्ये परतले. तत्कालीन धर्मानुसार समुद्रपर्यटन करण्याला बंदी असतानाही महाराजांनी ही बंदी जाहीरपणे मोडली आणि कसलेही प्रायश्चित्त घेतले नाही, याबद्दल भट पांड्यांनी बरीच आगपाखड केली. त्यानंतर महाराजांनी दिल्ली, कानपूर ,शिमला, भावनगर अशा भागांमध्ये दौरे केले. आपल्या राज्याच्या भौतिक विकासाबरोबरच महाराजांनी जनतेच्या आत्मसन्मानाचा विकास केला. आपल्या राज्यात सर्व जाती धर्माच्या मुलांना त्यांनी शिक्षणाची मोफत सोय केली. वसतिगृहे काढली.१४ एप्रिल १९०८ रोजी त्यांनी कोल्हापूर येथे अस्पृश्य मुलांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरू केले. महाराजांना महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाविषयी विशेष आकर्षण होते. ११ जानेवारी १९११ रोजी महाराजांनी कोल्हापूर येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आपल्या राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना माफीचा निर्णय शाहूराजांनी २० मे १९२१ रोजी घेतला. आपल्यानंतर आपल्या वारसांनी

आधुनिक पद्धतीने राज्यकारभार करावा, यासाठी महाराजांनी प्रिन्स शिवाजी व राजाराम या आपल्या दोन्ही मुलांना आधुनिक इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी ११ मे १९१२ रोजी इंग्लंडला पाठवले. महाराजांच्या 'बहुजन हिताय' धोरणामुळे बावचळलेल्या अंतर्गत विरोधकांना नमवत महाराजांनी बहुजनांच्या, दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्तांच्या हितासाठी विविध निर्णय धडाकेबाज पणे राबविले. पाटील कुलकर्णी (तलाठी ) ही पदं पूर्वी जन्म जातीनुसार होती. ही पद्धत शाहूराजांनी बंद केली आणि जो कोणी लायक असेल तो कोणीही पाटील , कुलकर्णी (तलाठी ) होऊ शकतो असा कायदा केला. त्यांनी पाटील , कुलकर्णी प्रशिक्षण केंद्रे सुरू केली. त्याचबरोबर पुरोहितही विशिष्ट जातीतून न येता ज्या कुणाला धार्मिक कार्य, विधी उचितरीत्या पार पाडता येतात अशा कुणाही जातीच्या व्यक्तीला धार्मिक विधी करण्याचा अधिकार दिला.

भारतात त्या काळी अनेक संस्थानिक होते. परंतु इंग्रजांच्या मानधनावर बसून खात आराम करणारे होते. मात्र शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने एक दृष्टे समाज क्रांतिकारक होते. आपल्या राज्यकारभाराचा प्रत्येक क्षण त्यांनी जनतेच्या सेवेसाठी खर्च केला. ८ सप्टेंबर १९१७ रोजी महाराजांनी आपल्या राज्यात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा घोषित केला. २३ फेब्रुवारी १९१८ रोजी महाराजांनी क्रांतिकारी असा 'आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला पाठिंबा देणारा कायदा' केला. त्याच वर्षी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करणारा व त्यांना मानवी हक्क बहाल करणारा जाहीरनामा ही महाराजांनी काढला. मांग, रामोशी, बेरड, भिल्ल, पारधी आदी जाती जमातींना इंग्रज सरकारने 'जन्मजात गुन्हेगार ' घोषित करून ,तीन वेळची हाजरी लावली होती. ती शाहू महाराजांनी १ ऑगस्ट १९१८ रोजी खास आदेश काढून कायद्याने बंद केली. ३१ जानेवारी १९२० रोजी मुंबई येथे 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू करण्यासाठी शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मोठी आर्थिक मदत केली. तसेच २१ व २२ मार्च १९२० रोजी महाराजांनी कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव येथे' दख्खन अस्पृश्य समाज परिषद' घेतली आणि या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकर हेच अस्पृश्यांचे नेते आहेत आणि ते भारताचे भावी पुढारी आहेत, असे जाहीर केले.

केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर राज्याबाहेरही नाशिक, नागपूर, दिल्ली आदी ठिकाणी जाऊन शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या परिषदा घेतल्या. वस्तीगृहे काढली. शाळांना मदत केली. बहुजनांना ब्राह्मणांच्या धार्मिक गुलामगिरीतून कायमचे मुक्त करण्यासाठी महाराजांनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी सदाशिव लक्ष्मण पाटील यांची 'क्षात्र जगद्गुरु' म्हणून नेमणूक केली. अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांनीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आर्थिक मदत करून इंग्लड येथे उच्च शिक्षणासाठी पाठविले. आयुष्याच्या अखेरपर्यंत महाराजांनी दलित, वंचित, उपेक्षित, शोषित स्त्री शूद्र अतिशूद्रांसाठी कार्य केले.१६ फेब्रुवारी १९२२ रोजी दिल्ली येथे भरलेल्या 'तिसऱ्या अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे' अध्यक्षपद शाहूराजांनी भूषविले. आणि त्याच महिन्यात हरयाणातील कुरुक्षेत्र येथे महात्मा गांधींची भेटही घेतली.

बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड यांची नात राजकन्या लक्ष्मीबाई यांच्या विवाहाला उपस्थित राहून महाराज ४ मे १९२२ रोजी मुंबईत परतले. आणि त्याच रात्री त्यांना छातीत त्रास झाला. ६ मे १९२२ रोजी सकाळी सहा वाजता वयाच्या अवघ्या ४८ व्या वर्षी मुंबईतील 'पन्हाळा लॉज ' या आपल्या बंगल्यात महाराजांचे निर्वाण झाले.

अवघे अठ्ठेचाळीस वर्षांचे आयुष्य महाराजांना लाभले. मात्र किती काळ जगावे, यापेक्षा कसे जगावे हेच महाराजांच्या जीवन कार्याच्या अभ्यासातून आपणास लक्षात येते. शिवरायांच्या स्वराज्याच्या खुणा अंतर्गत बंडाळीने आणि पुरोहितशाहीने नष्ट केलेल्या होत्या. जनता प्रचंड दुःखी कष्टी होती. अशा काळात शाहू महाराजांनी आपल्या हातात राज्याची सूत्रे घेतली आणि अवघ्या राज्याचा कायापालट करून दाखविला. महाराजांच्या जीवनाला ऐश्वर्याची किनार आहे; तद्वतच दुःखाचीही एक विलक्षण धार आहे. अवघे तीन वर्षांचे वय असतानाच आईसाहेबांचे निधन झाले. त्यानंतर ज्यांनी त्यांना दत्तक घेतले होते, ते महाराज चौथे शिवाजी यांचे निर्वाण झाले. अल्पावधीतच जनक पिता त्यांना सोडून गेले. ऐन तारुण्यातील ज्येष्ठ पुत्र प्रिन्स शिवाजी हे शिकारीला गेले असता, घोड्यावरुन पडून मृत्यू पावले. या सर्व दुःखद घटनांचा प्रभाव शाहू महाराजांच्या मनावर शेवटपर्यंत राहिला. या दुःखातूनच त्यांच्या मनात गोरगरीबांबद्दल अपार कळवळा निर्माण झाला. आणि या कळवळयातूनच त्यांनी समाजक्रांती घडवून आणली. सत्तेवर येताच त्यांच्याविरुद्ध कट-कारस्थाने सुरू झाली होती. महाराजांचा राजवाडा बॉम्बस्फोटाने उडवून देण्याची योजना काही विघ्नसंतोषी लोकांनी आखली होती. स्फोट झाला; परंतु राजवाड्याच्या बाहेरच. महाराज आणि त्यांचे कुटुंबीय बालंबाल बचावले. महाराजांच्या वाटेवर काटे पेरण्याचे प्रयत्न सातत्याने झाले.

त्यांच्याविरोधात अनेक खोटे खटले दाखल करण्यात आले. इंग्रजांचे कान भरण्यात आले ; परंतु महाराज डगमगले नाहीत. हितशत्रूंशी लढत राहिले. प्रसंगी राज्याची आणि स्वतःच्या जीवाची बाजीही त्यांनी रयतेच्या हितासाठी लावली. मात्र जात्यंध, धर्मांध, वंशश्रेष्ठत्ववादी शक्तींशी कधीच तडजोड केली नाही. शाहू महाराज कसलेले मल्ल होते. कोल्हापुरी तांबड्या मातीत खेळून आपले शरीर त्यांनी पोलादाप्रमाणे मजबूत बनविले होते.ते रणमैदान गाजविणारे योद्धे होते. उत्कृष्ट नेमबाज शिकारी होते. त्याचबरोबर ते आदर्श राजकारणी आणि मुरलेले मुत्सद्दी तत्त्वज्ञ होते. महान सामाजिक क्रांतिकारक होते. स्त्री, शूद्रातिशूद्र, शेतकऱ्यांच्या भल्यासाठी ते लढत राहिले. सम्राट शिवरायांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे त्यांनी सुराज्यात रुपांतर केले. इंग्रजांसारख्या जागतिक सत्ताधीशांनी अनेक पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. त्याचबरोबर भारतीय जनतेनेही त्यांना 'राजर्षी' ही उपाधी देऊन त्यांचे नाव आपल्या काळजात कोरून ठेवले. खऱ्या अर्थानं राजा असूनही ऋषी सारखं जीवन जगलेले छत्रपती शाहू महाराज हे वंचित, उपेक्षित, शेतकरी, शोषितांचे तहहयात प्रेरणास्त्रोत राहतील. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक क्रांतीसाठी पूर्णपणे मदत केली होती. दि. ६-१०-१९२१ रोजी लंडनहून महाराजांना पाठविलेल्या एका पत्रात बाबासाहेब म्हणतात-

"श्री शाहू छत्रपती करवीर सरकार यांस सा.न.वि.वि.

आपले कृपापत्र पोहोचले.आपला लोभ व आपला स्नेह या दोहोंचा ओघ अजूनही मजकडे आहे, हे वाचून अत्यंत समाधान वाटले. आपल्यात व माझ्यात एवढे अंतर असताही आपण जो माझा गौरव करीतां याबद्दल मला आपले उतराई होणे केव्हाच शक्य नाही. आपल्यासारख्या निष्काम व दिनदयाळू सत्पुरुषाची मला जोड मिळाली यातच मी माझ्या आयुष्याचे चीज झाले असे समजतो."

**संदर्भ ग्रंथ**

1. पवार डॉ. जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व कार्य' , महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, शिवतेज, १०८, साने गुरुजी वसाहत, राधानगरी रोड, कोल्हापूर- ४१६०११, अकरावी आवृत्ती- १ एप्रिल २०१७.

2. साळुंखे प्रा. नानासाहेब, 'शाहूंच्या आठवणी', वृषाली प्रकाशन,४२/२, मनीषा नगर, रिंग रोड, कोल्हापूर. पाचवी आवृत्ती- ७ जानेवारी २००९.
3. पाटील डॉ. पद्मा, ' राजर्षी' , एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, रॉयल नेस्ट, पर्ल हॉटेल रोड, ताराबाई पार्क, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती- ऑक्टोबर २००७.
4. कोंडेकर डॉ. आर. एस. 'रयतेचा राजा: राजर्षी शाहू महाराज', अरुणा प्रकाशन,१०३, ओमकार कॉम्प्लेक्स, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर. प्रथम आवृत्ती- ११ एप्रिल २०११.
5. बिरांजे डॉ. संभाजी (संपा.) 'छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र पत्र व्यवहार', विनिमय पब्लिकेशन्स, समता चाळ पोलीस स्टेशन जवळ, सूर्य नगर, एलबीएस मार्ग, विक्रोळी, मुंबई. प्रथम आवृत्ती- २६ जून २०१९.

# राजश्री शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**प्रा . डॉ . अन्सारी एस. जी**

**समाजशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर**

शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान प्रशंसनीय आहे. त्यांनी केवळ उच्चवर्णीयांना शिकवण्याचा प्रयत्न केला नसून बहुजन समाजाला देखील शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले या बाबत अँड. गोविंद पानसरे म्हणतात "ज्या समाजात शिक्षणाचा वारसानव्हता आणि परंपरांनी ज्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता अशा समाजाचे महाराष्ट्रातले विद्येचे माहेरघर जर कोणते असेल, तर ते कोल्हापूर आणि माहेर घराचा पाया घालणारा दूरदृष्टीचा महापुरुष जर कोण असेल तर ते म्हणजे शाहू महाराज. बहुसंख्य शिक्षित झालेल्या असंख्य नेत्यांनी कोल्हापुरात शिक्षण घेतले आहे आणि ते आपोआप घडलेले नाही. यामागे शाहू महाराजांची भूमिका आणि त्यांचा व्यवहार आहे. शिक्षण क्षेत्रात कोल्हापूर आणि बजावलेली कामगिरी आता सर्वसामान्य झाली आहे. शाहू महाराजांचे या क्षेत्रातील योगदान मान्यता पावले आहे. परंतु शिक्षण विषयकशाहू महाराजांच्या भूमिकेचे वेगळेपण म्हणावे तसे पुढे येत नाही आजच्या संदर्भात सुद्धा त्यांची ही भूमिका आहे हे नीट लक्षात घ्यायला हवी". शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान आजच्या संदर्भात जागतिक पातळीवर सुद्धा महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्रासह जगातील शैक्षणिक चळवळीचा उल्लेख करताना जे काही शैक्षणिक विचारवंत होऊन गेले ज्यांनी समाजात शैक्षणिक मूल्य रुजवली त्यापैकी राजश्री शाहू महाराज हे नाव अतिशय महत्त्वाचेआहे.

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलन तंत्राच्या आधारे करण्यात आले आहे.

उदेश : राजश्रीशाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान अभ्यासणे.

शाहू महाराजांनी शिक्षणाचा आणि सर्वसामान्य माणसाच्या जीवनासाठीच शिक्षण महत्त्वाचे आहे हा विचार वैश्विक समाजात पेरला शिक्षणाबद्दल असे म्हटले जाते की "शिक्षणाचा अर्थ अगदी एका शब्दात सांगायचं झाल्यास शिक्षण म्हणजे बदल होय, शिक्षण म्हणजे माणसाचा सर्वांगीण विकास शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होय. शिक्षण म्हणजे व्यक्तीत बदल घडून आणणे शिक्षण म्हणजे माणसात असलेल्या जन्मजात, निसर्गदत्त शक्ती जागृत करून त्यांना पूर्णत्वाकडे नेणे होय". सर्वांगीण विकासाकरिता शिक्षण हे अतिशय महत्त्वाचे आहे. हा विचार शाहू महाराजांनी हेरला आणि समाजात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याकरिता प्रयत्न केले. शिक्षणाचे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार प्रचार होणे अनिवार्य आहे हे त्यांनी जाणले होते. याबाबत असे म्हटले जाते शाहू महाराजांचे गुरु अनुभवी, शिस्तप्रिय चर्चा संपन्न होते. त्यामुळे महाराजांना व्यवहारवादी, वास्तववादी व लोककल्याणकारी राजा होता आले. त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना जागतिक स्तरावरील शिक्षणतज्ञ असे म्हटले जाते.

शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात बदल घडून आणण्यासाठी एकोणीस कलमी शिक्षण प्रणाली राबवली त्यात पुढील कलमांचा समावेश आहे. समाजात सर्वसामान्य माणसांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करून दिला. प्राथमिक शिक्षण अनिवार्य करण्याकरिता 24 जुलै 1917 ला हुकुम काढून प्राथमिक शिक्षण योजना आखली. सर्वांच्या विकासाकरिता शिक्षण महत्त्वाचे आहे कारण शिक्षणातून समाजाची आणि राष्ट्राची समृद्धी होईल हा विचार पेरला. सर्वसामान्य माणसाच्या विकासाकरिता विविध शैक्षणिक योजना राबवल्या. सामाजिक शिक्षणातून समाज परिवर्तन घडविण्याचे काम शाहू महाराजांनी केले. शिक्षणातून समाजात एकतेचा विचार पेरण्याचे काम शाहू महाराजांनी केले . शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी शैक्षणिक पंच नेमले. लोकशिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विविध जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा निर्माण केल्या. शाळेत समाजातील वतनी शिक्षक निर्माण केले .त्यातून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मदत झाली. शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता राजाराम हायस्कूल व विविध हायस्कूलची निर्मिती करून त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. उच्च शिक्षण प्राप्त करण्यासाठी कोल्हापूरत राजाराम महाविद्यालयाची स्थापना केली. क्रिडा

क्षेत्रातून मल्लविद्येचे शिक्षण सार्वत्रिक केले. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी वस्तीगृह शाळा सुरू केल्या. त्या करिता आर्थिक अडचणी निर्माण होऊ नये म्हणून शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांकरीता सुरू केली. स्त्री-पुरुष समानतेच्या भावनेतून स्त्रियांकरिता शिक्षणाची दारे उघडून दिली स्त्रियांना कृतिशील शिक्षण देऊन समानतेचा विचार समाजात पेरला. स्त्रियाचे बाजूने अनेक कायदे केले त्यात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधकायदा, - 2 ऑगस्ट 1919. अनौरस संतती व देवदासी प्रतिबंधक कायदा 17 जाने 1920. काडीमोड कायदा - 11जुलै1919करून स्त्रियांचे सबलीकरण केले. शिक्षणातून समाजाची भौतिक, आर्थिक प्रगती होण्याकरिता तांत्रिक शिक्षण सक्तीचे केले.तंत्र विज्ञानाच्या शाळा सुरू केल्या. जगण्याची समान हक्क मिळवून देण्यासाठी उपेक्षित आणि वंचित घटकांसाठी शिक्षण उपलब्ध करून दिले. गाव त्या ठिकाणी शाळा निर्माण करून खऱ्या अर्थाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणशाहू महाराजांनी केले.

महाराजांनी आपल्या प्रत्येक भाषणातून शिक्षणासंबंधी दूरदृष्टीचे विचार मांडले 1918 साली परळ येथे भरलेल्या कामगारांच्या प्रचंड जाहीर सभेत महाराज म्हणतात, "आपल्या मुलाबाळास शिक्षण देऊन व आपल्या आरोग्य वाढवण्याचे प्रयत्न करून आपली उन्नती आपणच करून घेतली पाहिजे दुसरा काही करेल अशी अपेक्षा करणे केव्हाही कमीपणाचे आहे". कामगारांना क्रांतीची दीक्षा दाखवणारा हा जगातील पहिला राजा होय. जनतेने आपल्या आर्थिक आणि शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी सतत झगडले पाहिजे असा जाहीर उपदेश महाराजांनी त्यावेळच्या कामगारांना दिला होता. बहुजन समाज शिक्षणाच्या प्रवाहातून दूर राहिला होता. त्यामुळे महत्त्वाची अधिकारपदेबहुजन समाजाला मिळवता आली नाही. सन 1881 च्या जनगणनेनुसार कोल्हापूर संस्थानात साक्षरतेचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

**तक्ता - 1**

| | | |
|---|---|---|
| 1 | ब्राम्हण | 79 . 1% |
| 2 | मराठा | 8.6% |
| 3 | कुणबी | 1 . 5 % |
| 4 | जैन व लिगायत | 10.6% |
| 5 | मुस्लीम | 7.5% |

वरील साक्षरतेच्या प्रमाणावरून बहुजन जाती शिक्षणाच्या बाबतीत किती मागासलेल्या होत्या हे स्पष्ट दिसून येते. यावरून असे लक्षात येते की, बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता याचा अर्थ त्यांच्याकडे हुशारी नव्हती असा नव्हे पण त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळाले नाही. शिक्षणाचे बिजारोपण करून बहुजन समाजाला शिकूवून मोठे करण्याचे आव्हान शाहू महाराजांकडे होते. म्हणून महाराजांनी या बाबीचा विचार करून काही उपाय योजना व कार्यक्रम आखले हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी व स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी परदेशी पाठवण्यात आले. यावरून शाहू महाराजांची विदेशी शिक्षणाबद्दलची धोरण व भूमिका स्पष्ट होते. शाहू महाराजांनी वीस वसतिगृहाची स्थापना केली. ही वस्तीगृहे विविध जाती-धर्मांच्या लोकांसाठी होती. या वस्तीगृहाच्या स्थापनेमध्ये विविधता दिसते बहुजन समाजाबाबत ची आस्था दिसते हे या वसतीगृहाच्यानावावरून दिसून येते.

**तक्ता – 2 वसतीगृह**

| | | |
|---|---|---|
| 1. | 1901 | व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग |
| 2. | 1905 | दिगंबर जैनबोर्डिंग |
| 3. | 1906 | मुस्लिम बोर्डिंग |
| 4. | 1907 | वीरशैव व बोर्डिंग |
| 5. | 1908 | मिस क्लार्क बोर्डिंग |

| | | |
|---|---|---|
| 6. | 1908 | दैवज्ञ बोर्डिंग |
| 7. | 1911 | नामदेवबोर्डिंग |
| 8. | 1912 | कायस्थप्रभुबोर्डिंग |
| 9. | 1912 | पांचाळ ब्राह्मण बोर्डिंग |
| 10. | 1912 | सारस्वत बोर्डिंग |
| 11. | 1915 | इंडियन ख्रिश्चन बोर्डिंग |
| 12. | 1918 | आर्य समाज गुरुकुल |
| 13. | 1918 | वैश्य बोर्डिंग |
| 14. | 1919 | ढोर -चांभार बोर्डिंग |
| 15. | 1920 | शिवाजी वैदिक विद्यालय बो |
| 16. | 1920 | प्रिन्स शिवाजी फ्रि मराठा बोर्डिंग |
| 17. | 1920 | सोमवंशी आर्य क्षत्रिय बोर्डिंग |
| 18. | 1921 | सुतार बोर्डिंग |
| 19. | 1921 | नाभिकबोर्डिंग |
| 20. | 1921 | श्री देवांगबोर्डींग |

शाहू महाराज शिक्षणाबाबत आस्था असणारे व्यक्तिमत्व होते. त्यांची शैक्षणिक दृष्टी व्यापक व सखोल होती. म्हणून त्यांचे शैक्षणिक कार्यभारतापुरते मर्यादित राहिले नाही तर तरबहुजन समाजाने भारताबाहेर जाऊन आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी ते प्रयत्नशील होते. विदेशी शिक्षणा बद्दल त्यांनी भारतीय बहुजन समाजाची हुशारी ओळखून त्यानुसार त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिली. वैश्विक शिक्षणाचा संदर्भ घेतला तर शाहू महाराजांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांनी आपल्या शैक्षणिक कार्याचे झेंडे विदेशा पर्यंत रोवले आहेत. शाहू महाराजांनी सामाजिक विषमतेचे निर्मूलन केले. त्याचबरोबर शिक्षणाची परिस्थिती सुधारण्यासाठी अथक प्रयत्न केले. सामाजिक विषमता व शिक्षणाबद्दल फक्त आपल्या भाषणातून त्यानी विचार मांडले नाही तर प्रत्यक्षात आपल्या संस्थानात व खाजगी व्यवहारातूनही त्यांनी प्रत्यक्षात कृतीतून उतरले होते. न. र. फाटक म्हणतात "जनतेमध्ये ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय स्वराज्य चालवण्याची पात्रता लोकात यायची नाही तिच्यासाठी निदान प्राथमिक तीन इयत्ता पर्यंत प्रत्येक माणसाचे शिक्षण झाले पाहिजे, तितके शिक्षण झाले की आपण आपले राज्य लोकांच्या स्वाधीन करू, अशी भाषा शाहू महाराजांनी वापरली होती". आज स्वातंत्र्याला 70 वर्षे पूर्ण होऊनही ग्रामीण व शहरी भागातील कित्येक मुले प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत त्यांच्यासाठी आपण अजूनही योग्य पावले उचलू शकलो नाहीत. शिक्षणाच्या प्रवाहात आपण त्यांना कधी सामील करून घेऊन हे भविष्यकाळ ठरवेल पण हे शाहू महाराजांचे स्वप्न ज्यावेळेस आपण पूर्ण करू तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांच्या आचार विचारांचे पालन आपण करू शकलो असे म्हणावे लागेल.

संदर्भसूची:

1. डॉ. जयसिंगराव पवार, (2013), राजश्री शाहू छत्रपती-जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर .
2. श्री. रा. ना. चव्हाण, (2013 ) राजश्री शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य, प्रतिमा प्रकाशन.
3. प्रा. नानासाहेब साळुंखे (2006) शाहूंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर.
4. भगवानराव जाधव (1971)राजश्री शाहू महाराजांची भाषणे, राजश्री प्रकाशन कोल्हापूर.

# छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यता निर्मुलन कार्य

**प्रा. राहुल भागवत गायकवाड**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय डेहणे. ता. खेड, जि. पुणे. ४१२४०२

**प्रास्ताविकः—**

महात्मा जोतीराव फुले यांच्या नंतर महाराष्ट्रात सामाजिक क्रांती घडवून आणणारे एक पराक्रमी व कर्तबगार महान पुरूष म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होय. विचारपुर्वक स्विकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता त्या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांची अचाट बुध्दीक्षमता व कार्यशैली या गुणांमुळेच त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता अखिल़ महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण भारतात लोकप्रिय झाले त्यांच्या वरील गुणांमुळे त्यांच्यावर अस्पृश्यांचा राजा असा शिक्का मारला जातो. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता आजही टिकुन आहे हे पाहायला मिळते. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले आणि बहुजन समाजाचे कर्तव्य काय आहेत आणि बहुजन समाजाने समाजात आपले स्थान हक्काने आणि संघर्षाने निर्माण करावे असे वेगवेगळया सामाजिक परिषदामधून सांगून दिले. शाहू महाराज राजे असूनही ब्राम्हण समाजाने त्यांना शुद्र राजा ठरविले होते. महाराजांच्या जीवनात ''वेदोक्त प्रकरणाने'' संघर्ष पेटला होता. हा एक त्यांच्या जीवनदृष्टीला कलाटणी देणारा प्रसंग ठरला शाहू महाराजांना कळून चुकले होते की, आपण राजे असूनही ब्राम्हण समाज मला शुद्र मानतो. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी ब्राम्हणांचे वर्तन जसे होते तसेच माझ्याविषयी सुध्दा आहे. तर शुद्राचे काय हाल केले असतील पिढयांपिढया अन्यायी, जुलमाच्या जोखडाखाली अडकलेला हा शुद्र समाज शिकून पुढे आला तरच त्यांचा विकास होईल असे शाहू महाराजांना वाटे याच काळात ब्राम्हणांचे मोठे वर्चस्व होते. मनुच्या नियमावलीप्रमाणे शुद्र व इतर जातींना वागवीत असत जाती जातींची उतरंड तयार करून ठेवली होती बहुजनांवर वेगवेगळी बंधने लादली होती समाजात कर्मकांडाचे स्तोम माजले होते अशातून या अस्पृश्य समाजाची सूटका करून त्याला सर्व समाजाबरोबर प्रगत व सुशिक्षित बनविण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले बहुजन समाजाविषयी असलेली आपुलकी आणि उध्दार करण्याची उर्मी शाहू महाराजात होती यामुळे आप्त व स्वकीयांचा रोष व टिकेला सामोरे जावे लागले तरीही महाराजांनी आपल्या ध्येय धोरणात व तत्वांमध्ये किंचितही बदल केला नाही. म्हणूनच त्यांना रयतेचा राजा म्हटले जाते.

**१)राजर्षीशाहू महाराजः—**

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पाहिला तर फुले, शाहू, आंबेडकर यांची सामाजिक आणि शैक्षणिक कामगिरी अतुलनिय आहे. शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. कागलच्या जहागीरीचे प्रमुख आबासाहेब घाटगे यांचे ते पुत्र त्यांचे मुळ नाव यशवंतराव होय. १७ मार्च १८८४ रोजी ते कोल्हापुरच्या राजघराण्यात दत्तक म्हणून गेले त्यांचे सुरूवातीचे शिक्षण राजकोटच्या राजकुमार महाविद्यालयात झाले. १ एप्रिल १८८१ रोजी त्यांचा विवाह बडोद्याचे सरदार गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी झाला.

शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेताना आपल्या राज्यातील सर्व तालुका ठिकाणांची पाहणी केली. त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या जहागीरदारांच्या ठिकाणांना भेटी दिल्या सर्वसामान्य जनांची वास्तव स्थिती जाणून घेतली व २ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली व या दिवसापासून शाहू राजे कोल्हापूरचे राज्यकर्ते छत्रपती झाले या प्रसंगी टिळकांनी ''करवीर क्षेत्री राजकीय कपिलाषष्टीचा योग'' हा अग्रलेख लिहून शाहू महाराजांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर शाहू महाराजांनी राजप्रतिनिधी मंडळाला दिलेले राज्यकारभाराचे हक्क रद्द करून त्याचे सल्लागार मंडळात रूपांतर केले. दिवाणाच्या अध्यक्षतेखाली मंडळाचे कामकाज सुरू झाले. 'हुजूर' नावाचे सचिवालय तयार करून रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांना मुख्य सचिव नेमले. शासकीय काम व हुकूमांवर सहयांचे आधिकार स्वतःकडे ठेवून घेतले. राज्यकारभारात बदल करण्याचा मुख्य हेतू म्हणजे समाज सुधारणांच्या मार्गातील अडथळे दूर करून सर्वांना विकासात सामावून घेणे. तसेच राज्यकारभारात सर्व जातीच्या लोकांना स्थान दिले यातच महाराजांचे दूरदृष्टीत्वदिसून येते.

**२)तत्कालीन सामाजिक परिस्थितीः—**

छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर जे पाच छत्रपती होऊन गेले त्यांना इंग्रजांशी जुळवून घेऊनच राज्यकारभार करावा लागला संस्थानात उच्चस्थ पदांवर युरोपीय आणि संस्थानाबाहेरील व्यक्ती काम करीत होत्या यामध्ये बहुजन समाजातील एकही व्यक्ती नव्हता. मांडलिक,देशमुख यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली आणि परिस्थितीनुसार धोरण स्विकारणे त्यांना गरजेचे वाटत होते त्यात त्यांच्या मनाची दुविधा स्थिती निर्माण झाली आणि आपल्या पुर्वजांनी इंग्रजांशी संघर्ष करून जसे संकट ओढवून घेतले तसे न करता इंग्रजांशी सहकार्याची भावना ठेवून त्यांच्या मदतीने बहुजन समाजाचा विकास आणि उध्दार करणे हे धोरण स्वीकारणे अती महत्वाचे वाटले आणि तसेच केले स्वराज्य तर हवे पण

त्याअगोदर सुराज्या निर्माण करणे. लोकशाही येण्यासाठी बहुजन समाजात जागृती येणे महत्वाचे होते बहुजन समाजात जागृती न झाल्यास येणाऱ्या स्वराज्याचे फायदे जाती संस्थेतील केवळ वरीष्ठ जातीतील घटकांनाच होणार हे अगदी सत्य होते बहुजन समाज त्यापासून वंचित राहिल असे शाहू महाराज ओळखून होते. संस्थानातील परिस्थिती आणि वर्णव्यवस्थेचे वर्चस्व यामुळे आधिकार पदाच्या जागांवर बहुजन समाजातील एकही व्यक्ती नव्हता ही स्थिती बदलण्यासाठी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार होणे महत्वाचे होते. यात येणाऱ्या अडचणींवर मात करणे गरजेचे होते. अस्पृश्यांना आणि स्त्रीयांना अनेक जाती बंधनं होती. त्यांचे जीवन म्हणजे नरकयातना होय. धार्मिक जीवनात कर्मकांड,अंधश्रदधा,बुवाबाजी आणि पुरोहिताच्या श्रेष्ठत्वाला प्राधान्य होते ब्राम्हणांनी तर जाती व्यवस्थेची बंधन आधिक मजबूत कशी होतील अशी व्यवस्था निर्माण करून ठेवली होती आणि आपले श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी बहुजनांवर अन्याय,अत्याचार करणे हे त्यांचे सुत्रच बनले होते,म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी सत्ता व आधिकार ग्रहण करताच बहुजनांच्या प्रगतीसाठी धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात क्रांतीकारक बदल केले. स्वातंत्र्य भोगण्यालायक बहुजन समाजाला बनविणे गरजेचे होते यासाठीच त्यांनी आपले संपुर्ण खर्ची केले.

**३) वेदोक्त प्रकरण आणि शाहू महाराजांची मानसिकता:—**

शाहू महाराजांचे धोरण सामाजिक समता व देशोन्नतीस उपयुक्त असले तरी, अज्ञानी व अंधश्रध्दा समाजावर निरनिराळे बंधने ठेऊन आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या ब्राम्हण समाजाला हे धोरण मान्य नव्हते. आपल्या संस्थानात आधिकारी वर्ग हा उच्च वर्णिय आहे त्यात बहुजन लोक अल्पप्रमाणात आहेत असे दिसल्यावर सन १८९४ पासून बहुजनांना नोकऱ्यांमध्ये सामील करून घेण्यास सुरूवात केली पण या निर्णयाने ब्राम्हण समाज नाराज झाला. बहुजनांना मोठया आधिकारपदाच्या नोकऱ्या म्हणजे आमचे आर्थिक नुकसान होय असे त्यांना वाटे म्हणून ब्राम्हणांनी या निर्णयाला विरोध केला पण असे प्राचीन काळापासून चालत आले आहे. म्हणून शाहू महाराज म्हणतात.

''ब्राम्हणांची कारस्थाने कधी बंद होणार नाहीत असे मला वाटते कारण त्यांना मागासलेल्या वर्गाना पुढे आणण्याचे माझे धोरण मात्र पुष्कळ ब्राम्हणांना आवडत नव्हते''.पृष्ठ—४

वरील विधानाचा विचार केला तर भारतात ब्राम्हण समाजाची मानसिकता अशी होती की, इतर समाजाने आहे त्या परिस्थितीमध्येच राहावे त्यांना आधिकार पदाच्या जागा परंपरेने नाकारलेल्या आहेत. बहुजनाने परंपरेविरूध्द वागणे म्हणजे धर्मभ्रष्ट करणे होय असा त्यांचा समज होता आणि जातीची जाचक अशी बंधन होती त्या बंधनांना तोडण्याचे काम शाहू महाराजांनी केले.

शाहू महाराजांच्या जीवनाला कलाटणी देणारे 'वेदोक्त प्रकरण' घडले आणि संपुर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. यामुळे ब्राम्हणी प्रवृत्तीची कल्पना महाराजांना आली जर राजासोबत ब्राम्हणांचे वर्तन असे असेल तर सर्वसामान्याबराबर यांचे किती कठोर वर्तन असेल म्हणून शाहू महाराजांनी भिक्षुकशाहीबरोबर संघर्ष करायचा ठरविले व ब्राम्हणांना दिलेले आधिकार पदव्या, इनामे, वतने काढुन घेऊन ब्राम्हणांचे वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हणांच्या जागी विविध जातीतील हुशार व्यक्तींना नेमूण सामाजिक क्रांती घडवून आणणारा महान पुरूषशाहू राजे होते. धार्मिक विधीत नवशिक्षित पुरोहित तयार केले. 'पुरोहितांची शाळा' काढली प्रत्येक जातीचा स्वतंत्र पुरोहित तयार केला यातून सर्व बहुजन समाज एकत्र आल्याचे स्पष्ट होते की, छत्रपती शाहू महाराजांनी ब्राम्हण समाजाला विरोध केला नसून त्यांच्या मानसिकतेला आणि त्यांच्या प्रवृत्तीला विरोध केला आहे हे महत्वाचे आहे.

**४) अस्पृश्योध्दार:—**

वेदोक्त प्रकरणाने महाराजाचे मन जागृत झाले होते. संस्थानातील नोकर असणारे ब्राम्हण राजास अशा तऱ्हेचे वागणूक देत असतील तर बहुजन समाजांस हे धर्माचे ठेकेदार कशा पध्दतीने वागवीत असतील याची कल्पना शाहू महाराजांस आली होती. म्हणून शिक्षणाने अस्पृश्योध्दार करण्याचे ठरवीले व त्या दिशेने हळूहळू पाऊले टाकण्यास सुरवात केली. भटशाहीने अनेक मार्गानी शाहू महाराजांस रोखण्याचा प्रयत्न केला. 'वाईटातून चांगले' या न्यायाने वर्णवर्चस्ववाद्यांच्याविरूध्द लढण्याची महाराजांची मनोभुमिका अधिक खंबीर व तत्वनिष्ठ बनली.

ब्राम्हणांनी लादलेल्या बहुजनांच्या गुलामगिरीविरूध्द शुद्रातिशुद्रांना संघर्ष करण्यास तयार करणे ही फार अवघड गोष्ट होती. आणि यावर जालीम उपाय म्हणजे बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे होते. तरच ही गोष्ट शक्य होणार होती म्हणून महाराजांनी अस्पृश्य सामाजाच्या शिक्षणासाठी खास आदेश दिले त्या आदेशान्वये १९०६ मध्ये महार, चांभार अस्पृश्य लोकांसाठी 'रात्रीची शाळा' स्थापन केली. १९०७ मध्ये चांभार, ढोर अस्पृश्यांच्या मुलींच्या शाळेसाठी परवानगी दिली व ९६ रूपये खर्चाची तरतुद केली. तसेच अस्पृश्यांच्या वसतिगृहांच्या इमारतीस जागा दिली. आणि १९११ च्या आदेशांन्वये अस्पृश्य वर्गातील सर्व मुलांना मोफत शिक्षणाची सोय केली. व हुशार विद्यार्थ्यांना खास अशाशिष्यवृत्या चालू केल्या यापुढे जाऊन महाराजांनी २८ सप्टेंबर १९१९ रोजी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्याचा आदेश जारी केला. त्यात महाराज म्हणतात.

''करवीर इलाख्यात, अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी, स्वतंत्र शाळा असतात. त्या सर्व, येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांतून, इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून, शिवाशीव पाळण्याची नसल्याने, सर्व जातीच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे.''पृष्ठ—६१

वरील मताचा विचार केला तर, अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शिक्षणाची मोफत सोय करून शाहू महाराज हे बोलघेवडे सुधारक नसून ते कर्ते सुधारक होते. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यांना शिक्षण देऊन ब्राम्हणशाही विरोधात उभे राहण्याचे बळ दिले. हजारो वर्षांपासून चालत आलेली परंपरा शाहू महाराजांनी आपल्या आधिकाराच्या बळाने मोडून काढली आणि वर्णव्यवस्थेचे कंबरडे मोडले हीच सर्वात मोठी सामाजिक क्रांती घडली म्हणावी लागेल तसेच अस्पृश्यांच्या मुलांचे उपनयन करून त्यांना 'वेदांची संस्था' देणारा आणि त्यांना ब्राम्हणांच्या तथाकथित श्रेष्ठ दर्जावर आणून सोडणारा शाहू राजा हा भारताच्या ज्ञात इतिहासातील पहिला राजा म्हणावा लागेल.

मागासवर्गीयांच्या हितासाठी वाटेल ते करण्यास तयार होते. अस्पृश्यांना स्पृश्यांच्या बरोबरीने आधिकार मिळावेत त्यांना चांगले दिवस प्राप्त व्हावेत म्हणून धडपडत होते. जून १९१९ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरास लिहिलेल्या पत्रात म्हणतात.

''मागासवर्गीयांना दारिद्रयाच्या आणि दु:खाच्या चिखलातून बाहेर काढणे हे माझे पवित्र कार्य आहे असे मी खरोखरीच मानतो आणि, हे माझे पवित्र कर्तव्य करण्यात मी मागासवर्गीयांचीच सेवा करतो असे नाही, तर ती मानवजातीची करतो, अशी माझी पवित्र भावना आहे.'' पृ.६३.

वरील शाहू महाराजांच्या मताचा विचार केला तर त्यांनी स्पष्ट केले आहे की, मी विशिष्ट वर्गासाठी स्पृश्यांशी संघर्ष करत नसून समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी लढणार आहे. बहुजन समाज शिक्षण घेऊन इतर समाजाप्रमाणे सुसंस्कृत झाला पाहिजे. स्वातंत्र्याचा सर्वांनी उपभोग घेतला पाहिजे. असे कल्याणकारी विचार शाहू महाराजांचे होते.

शाहू महाराजांच्या काळात किंवा त्याआगोदर अशा काही प्रथा पडल्या होत्या की, ज्या गुन्हेगार प्रवृत्तीच्या जमाती होत्या त्यांना हजेरी पध्दत लागू होती. गुन्हा जर एका व्यक्तीने केला असेल तर सरसकट सर्वांनाच हजेरी द्यावी लागे हा प्रकार शाहू राजांनी २७ जुलै १९१८ च्या आदेशान्वये बंद केला आणि ज्याने गुन्हा केला आहे तो दोषी आहे. त्याचीच हजेरी चालू ठेवावी असे आदेश दिले त्यानंतर 'वेठवरळा' पध्दतीचे निर्मुलन करण्यातही पुढाकार घेतला. पाटील कुलकर्णी किंवा सरकारी आधिकारी, महारास अनेक प्रकारची कामे सांगुन विनामोबदला राबवून घेत असत म्हणून शाहूमहाराजांनी जो कोणी महार,मांग,चांभार यांच्याकडून विनामोबदला काम करून घेणाऱ्यास जबर शासन केले जाईल असा आदेश काढला आणि 'वेठवरळा' ही पध्दत बंद केली त्याचप्रमाणे 'महार वतन' खालसा करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात शाहू महाराजांना यश आले नाही. पण छत्रपती शाहू व डॉ. आंबेडकर यांच्याशी इमान राखणारे तत्कालीन मंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महार वतने खालसा करून महारांची गुलामगिरीतून मुक्तता केली.

समाजातील भिन्न जातींच्या दर्जामध्ये आणि आधिकारांमध्ये तफावत जेवढी जास्त असेल तेवढा तो समाज विघटीत राहतो. म्हणून शाहूराजांनी संस्थानात मोठे बदल घडवून आणले. प्रशासनात मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवल्या इथेच अस्पृश्यता निर्मुलनाचा पाया शाहू महाराजांनी घालून बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केले. म्हणून त्यांना रयतेचा राजा ही उपाधी दिली जाते.

**सारांश:–**

शाहू राजे हे एक कर्ते सुधारक होते वेदोक्त प्रकरणापासून त्यांनी धडा घेऊन वर्णवर्चस्वा विरूध्द बंड पुकारले राजा या नात्याने आधिकाराचा वापर करून संस्थानात अनेक महत्वाचे बदल घडवून आणण्यासाठी आदेश जारी केले जे आदेश पाळणार नाहीत त्यांना नोकरीतून बडतर्फ करून जबर प्रशासन केले. अस्पृश्यांचा उध्दार करण्यासाठी संस्थानात मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू केले. नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण बहुजनांसाठी ठेवले. स्वकीय आणि ब्राम्हणांचा याला प्रखर विरोध असूनही इंग्रजांच्या मदतीने नवनवीन सुधारणावादी धोरण राबवून जाती–जातींमध्ये अंतर कमी करण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. सर्वच क्षेत्रात अस्पृश्य समाजाला बरोबरीने आणण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला म्हणून ते युगपुरूष ठरतात.

**संदर्भग्रंथ:–**

१) फुलारी शरद, आचार्य राजेंद्र, 'राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ' (संपा), द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगाव, जि.रायगड. पृ.४.

२) पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जिवन व कार्य', ताराराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर प्रथम आवृत्ती २०१४ पृ.६१.

३) पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जिवन व कार्य', ताराराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर प्रथम आवृत्ती २०१४ पृ.६३.

४) भोळे भास्कर, 'छत्रपती शाहू महाराज', गंधर्व वेद प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती नोव्हेंबर २०१०

५) सावंत इंद्रजित, पाटील देविकाराणी, 'राजर्षी शाहू छत्रपती रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र', डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) तृतीय आवृत्ती २०१५.

# छत्रपती शाहू महाराजाचे स्त्रीमुक्तीविषयक कायदे

**डॉ. दिलीप सावंत**

मराठी विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार

**प्रस्तावना**

छत्रपती शाहू महाराज धार्मिक कार्याविषयी आढावा घेत असताना स्त्रीमुक्तीविषयक कायद्याचे त्याच्या कार्यात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवमुक्तीचे कार्य करीत असताना जशी वर्णवर्चस्वाची, गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रध्दा, चालीरिती, परंपरा, धर्मशास्त्राचा जाचक नियम व अटी आदींच्या माध्यमातून समाजाचे शोषण होत होते. ज्या बहुजन समाजाला वर्णवर्चस्वापासून मुक्त करु पाहत होते. त्या समाजातील अर्धी-अधिक लोकसंख्या स्त्रीवर्गाची होती आणि हा स्त्रीवर्ग पुरुषी वर्चस्वाखाली व त्यांनी निर्माण केलेल्या गुलामगिरीखाली पिचत होता. जो बहूजन समाज वर्णवर्चस्वातील जुलमापासून मुक्ती मिळू पाहत होता. त्या समाजाने आपल्या घरातील स्त्रियांनाही आपल्या पुरुषी वर्गवर्चस्वापासून मुक्त ठेवले पाहिजे, अशी महाराजांची व्यापक दृष्टी होती. स्त्रीचे समाजात होत असलेले शोषण पाहून महाराजांनी स्त्री अनिष्ट प्रथा व परंपरांच्या कचाट्यातून बाहेर काढण्यासाठी स्त्री मुक्तीसाठी काही कायदे केले ते पुढीलप्रमाणे पाहता येतील पुनर्विवाह नोंदणी कायदा स्त्रीला अनेक प्रकारच्या संकटाला सामोरे जावे लागत होते. त्यातीलच विधवा स्त्रीचा प्रश्न गंभीर होता. विधवा स्त्रियांना समाजातच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबियांचाही त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन एकूण तिरस्काराचा असे. काही कुटुंबांमध्ये त्यांना गुन्हेगारांप्रमाणे वागविले जाई. विशेषतः बालविधवा स्त्रियांचे जीणे तर अगतिक व शोचनीय बनत असे. अशा परिस्थितीनून सुटका करून व घेण्यासाठी पुनर्विवाह हा एक मार्ग असे; पण धर्मशास्त्रीय नियम आणि सामाजिक चालिरीती यांनी अशा पुनर्विवाहास प्रतिबंध केला होता. शाहू महाराजांनी हा प्रबंध कायदेशीर मार्गाने दूर करुन ज्या विधवांना पुनर्विवाह करावयाचा असेल त्यांना त्यांचा मार्ग मोकळा करून दिला. जुलै १९९७ मध्ये कोल्हापूर संस्थानात घ्पुनर्विवाह नोंदणी कायदाङ पास करण्यात आला. यानुसार विधवाना पुनर्विवाह करण्याचे कायद्याने स्वातंत्र्य दिले गेले. यामुळे पुनर्विवाहित स्त्रीजवळ आपल्या पुनर्विवाहाचा कायदेशीर पुरावा उपलब्ध झाला. बहुजन समाजातील वास्तविक स्थिती अशी होती की, जातींमध्ये विधवा-पुनर्विवाह हा पूर्वापार रुढ होताच, परंतु स्वतःला वर्णश्रेष्ठ समजणारे ब्राह्मण, जैन, मराठे इत्यादी विवाह धर्मशास्त्रीयदृष्ट्या निषिध्द समजत होते. महाराजांनी केलेला हा कायदा हा याच समाजासाठी होता आणि तो त्यांना प्रचंड मानसिक व सामाजिक धक्का देणारा होता. महाराज एकदा कानपूरला गेले असता तेथील कुरमी क्षत्रियामध्ये विधवा-विवाह प्रचलित असलेला पाहून मला मोठा आनंद होतो आपली क्षत्रिय जात भ्रूणहत्या, व्यभिचारादी पापापासून सुरक्षित राहील, असा माझा विश्वास आहे. हा आपद्धर्म आहे. मनुष्यसमाज निर्दोष राखण्यासाठी ही आहे. वेदादी शास्त्रांचे याला पाठबळ आहे. आमच्या गव्हर्नमेंटनेही विधवा-विवाहाचा कायदा पास केला आहे. ज्या जातीमध्ये या आपद्धर्माचा प्रचार नाही त्या जातीत भ्रूणहत्या व्यभिचार आदी करुन पाप घडत आहेत. हजारो मुले प्रतिवर्षी मरत आहेत. ही किती दुःखाची गोष्ट आहे बरे. स्त्रियाविषयी समाजात असलेली धार्मिक रूढी-परंपरा याना शाहू महाराजांनी छेद देऊन हजारो वर्षांपासून चालत आलेली अनिष्ट प्रथा मोडून काढण्यासाठीचे अस्त्र उचलेले. पुनर्विवाहास समाजाचा प्रचंड विरोध असतानाही शाहू महाराजांनी या विरोधाला न जुमानता धाडसी निर्णय घेतला. छत्रपती शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाह

करण्याचा कायदा करुन त्यांना स्त्रियांना नव्याने जीवन जगण्याचा हक्क प्रदान करुन दिला. त्यामुळे सर्व समाजातील स्त्रियांना सन्मानाने आज जगू दिले जात आहे. यांचे श्रेय शाहू महाराजांना द्यावे लागेल. आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह कायदा छत्रपती शाहू महाराजांनी जुलै १९१९ मध्ये विवाह नोंदणी पध्दतीस मान्यता देणारा कायदा आपल्या संस्थानात लागू केला. हा त्यांचा दुसरा सुधारणा कायदा म्हणावा लागेल. या कायद्याने विवाहाचे वेळी पुरुषाचे वय १८ वर्षे व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण व्हावे, अशी अट घातली. आंतरधर्मिय अथवा आंतरजातीय विवाहास कायद्याची मान्यता नव्हती. एकादा विवाह झाल्यास हा विवाह बेकायदेशीर ठरवून त्यापासून झालेल्या संततीची गणना अनौरस संततीत होत असे. महाराजांनी हा कायदा करुन समाजसुधारणेच्या क्षेत्रात क्रांतिकारी बदल केला. संबंधित पक्षांनी कोणत्याही पध्दतीने विवाह साजरा करावा, पण त्या विवाहाची नोंदणी सक्षम अधिकाऱ्यांसमोर झाली पाहिजे. कायद्याने कलम १३ मध्ये म्हटले आहे की, नोंदणारा व करारावर सही करणारे ३ साक्षीदार यांच्या समक्ष विवाह लावण्यात आला पाहिजे. तो कोणत्याही पध्दतीने लाविला तरी चालेल. मात्र प्रत्येक पक्षाने दुसऱ्या पक्षास नोंदणी व कायदेशीर पती-पत्नी म्हणून स्वीकारले आहे. याप्रमाणे अगर त्यांची जन्मभाषा असेल त्या भाषेत सदरहू अर्थाचे वाक्य उच्चारले पाहिजे. कलम ३ नुसार नवरी मुलीचे वय पूर्ण १८ वर्षे पूर्ण झाले नसेल तर तिने आपल्या बाप अगर पालन करणारा याची संमती विवाहास मिळवली असली पाहिजे. अशाप्रकारे आंतरधर्मीय अथवा आंतरजातीय विवाह करु इच्छिणाऱ्या स्त्रीला शाहू महाराजांनी पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य बहाल केलेले आढळते. एवढेच नव्हे, तर अशा विवाहाची नोंदणी स्क्तीची केल्याने त्या स्त्रीच्या पुढच्या वैवाहिक वाटचालीतही तिच्या विवाहबंधनाच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षणही दिले गेले होते. आजच्या प्रौढ विवाहाच्या युगात १४ वर्षांची ही अट प्रतिगामी वाटण्याची शक्यता आहे; पण त्याकाळी मुलींची लग्ने ६ ते ९ वर्षांच्यादरम्यान होत असत. काहींची लग्नेतर पाळण्यात होत असत. ही तत्कालीन वस्तुस्थिती लक्षात घेतली तर हा कायदा बराच पुरोगामी होता, हे लक्षात येते. ब्रिटिश सरकारने आपल्या मुलखात सन १८९१ साली जी संमती वयाचा कायदा पास केला होता, त्यात मुलीच्या विवाहयोग्य वयाची मर्यादा १२ वर्षे पूर्ण अशी होती. स्वतःला आधुनिक म्हणून घेणाऱ्या इंग्रज शासनकर्त्यांनाही मुलींच्या विवाहयोग्य मर्यादा १२ वर्षे असणे शास्त्रशुध्द वाटत होते. मग कोल्हापूरच्या कायद्यातील १४ वर्षांची वयोमर्यादा बरीच पुरोगामी म्हटली पाहिजे. स्त्री अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांवरील होत असलेल्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी ऑगस्ट १९१९ मध्ये स्त्रियांना क्रूरपणे वागविण्याचे बंद करण्याविषयी कायदा करण्यात आला. कलम १ नुसार क्रूरपणाची वागणूक म्हणजे जिच्या योगाने अयोग्य प्रकारची अनावश्यक शारीरिक दु:खे अगर पीड़ा उत्पन्न होते अगर जिच्या योगाने प्रकृतिस इजा होण्यासारखे मानसिक क्लेश होतात, अगर जिच्या योगाने प्रकृतिस शारीरिक अगर मानसिक मोठी इजा होण्यासारखी योग्य भीती उत्पन्न होते अशी वागणूक. क्रूरपणाची वागणूक कशाला म्हणावे. हे ठरविण्यासाठी ज्या गोष्टी जरुरीच्या आहेत म्हणून आम्ही सांगितले आहे, त्या गोष्टी मागासलेल्या वर्गाला आणि अशिक्षित समाजाला जास्त कडक आहेत, असे वाटण्याचा संभव आहे, परंतु शिक्षणाच्या सुपरिणामावरच केवळ आपण अवलंबून राहू लागलो तर स्त्रीवर्गाची स्थिती सुधारणेचे काम फारच मंदगतीने चालेल. शिक्षणाचा परिणाम लवकर घडून यावा, या हेतुसाठी मनुष्यात कायद्याच्या दहशतीची मदत पाहिजे, ही गोष्ट अगत्याची दिसून येत आहे. सर्व गोष्टी रीतीप्रमाणे व क्रमाक्रमाने होतच आहेत. आपण त्यात हात घालण्याचे काही कारण नाही. हे तत्त्व फक्त उच्च प्रतीच्या सुधारलेल्या समाजासच लागू पडणार आहे. मागासलेल्या लोकांची सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे

काम कायद्याची मदत घेतल्यावाचून केव्हाही होणार नाही. स्त्रियासंबंधी क्रूरपणाचे वागणुकीचे कित्येक प्रकार असे आहेत की ते अपराध या शब्दाखाली येऊ शकत नाहीत. मात्र ते प्रकार केव्हा केव्हा इतके दृष्ट प्रतीचे असतात की त्यामुळे स्त्री जातीला आपला जन्म केवळ कंटाळवाणा व भूभार आहे असे वाटू लागले. या गोष्टी लक्षात घेऊन क्रूरपणाची वागणूक या शब्दाची व्याख्या आम्ही अशी तयार केली आहे की, त्यातून कोणत्याही प्रकारची वाईट वागणूक सुटून जाता कामा नये. या कायद्याने पती पत्नी संबंधीच फक्त क्रूरपणाचे वागणूकीचा विचार केलेला आहे, असे नाही. हे नियम असे केलेले आहेत की स्त्रीजातीवर कोणत्याही प्रसंगी जुलूम होत असला तरी त्याचा विचार या कायद्याने करण्यात यावा. गेल्या जवळपास ९८ वर्षांपूर्वी छत्रपतींनी महिलावरील अन्याय अत्याचारांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी महिलाच्या सुरक्षतेसाठी कायदा बनवला, परंतु आधुनिक जगात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे महिलांनी शिक्षण घेऊन शासनाच्या विविध महत्त्वाच्या पदावर विरामान झाल्या आहेत. एवढेच नाहीतर भारताचे पंतप्राध व राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर विराजमान झाल्या आहेत, परंतु आज स्त्रियावरील होणारे अन्याय-अत्याचारदेखील थांबले नाहीत. आज दिवसेंदिवस वाढते बलात्कार, छेडाछेडी, हुंडापध्दती, तुच्छ वागणूक इत्यादी प्रकारच्या अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागत आहेत. घटस्फोटित कायदा भारतीय समाजात जातीला कलंक लागलेली बाब म्हणजे घटस्फोट होय. भारतात पुरुषप्रधान संस्कृती असल्याने छोट्या छोट्या कारणावरुन स्त्रियांना घटस्फोट दिला जातो. समाजात घटस्फोटाच्या संदर्भात सुधारणा करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी घटस्फोट कायदा केला. हिंदू समाजाच्या अनेक जातींमध्ये घटस्फोट घेण्याचे प्रमाण जास्त होते. ही प्रथा मोडण्यासाठी करवीर दरबाराच्या लक्षात आले आणि त्यापेक्षा ही परिस्थिती अशीच चालू राहिल्यास समाज सर्वस्वी नीतिभ्रष्ट होईल आणि विवाहविधी जो सुधारलेल्या समाजाच्या सर्व इमारतीचा पाया आहे. तो आजीबात नाहिसा होईल, असे दरबाराचे मत होते. त्यापेक्षा पती व पत्नी यांच्यातील भौतिक हितसंबंध कायद्याच्या मध्यस्थीनेच काडी मोडून घेऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे ठरविले आहे. काडी मोडणे ही जातीतील पंचांच्या लहरीवर सोडण्याची पडलेली चाल बंद करण्याचेही योजिले आहे. मुस्लीम समाजात पती आपल्या बायकोस तलाक देण्याचा जो हक्क आहे आहे. तो मान्य केला असला तरी त्यांच्या बायकोने अर्ज केला असेल त्यावेळी मेहरचा किती भाग नवऱ्यांने बायकोस द्यावा हे ठरविण्याचा अधिकार कोर्टास दिलेला होता. स्वातंत्र्यानंतर 75 वर्ष पूर्ण झाली असले तरी भटक्या विमुक्त जातींच्या पंचायतीच त्यांच्यातील घटस्फोटाचे निर्णय घेत असतात. अजूनही या जाती प्रस्थापित भारतीय समाजापासून कोसोदूर आहेत. ही परिस्थिती लक्षात घेतली असता, ९८ वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराजांनी जातपंचायतीच्या लहरी न्यायदानाकडे व त्याद्वारे भटक्या समाजातील स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्याय-अत्याचार मोडीत काढण्यासाठी शाहू महाराजांनी केलेला कायद्याचे अनन्यसाधारण लक्ष आहे. जोगतिणी प्रतिबंध कायदा छत्रपती शाहू महाराजांनी समाजाने देवाच्या नावावर सोडलेल्या जोगतिणी, मुरळी, देवदासी, भावीन इत्यादी अत्यंत कनिष्ठ दर्जाचे व उपेक्षित जीवन जगणाऱ्या या स्त्रियांच्यासंदर्भात आहे. देवाच्या नावाने लहानपणीच सोडलेल्या या स्त्रियांना पुढे अत्यंत अनैतिक वातावरणात आयुष्य कढावे लागते. महाराजांनी हा कायदा करुन या स्त्रियांना देवदासी सोडल्यामुळे जे विशिष्ट हक्क प्राप्त होतात या कायद्याने रद्द केले. प्राचीन रुढीच्या दबावाखाली ज्यांचे आयुष्य लहानपणी सार्वजनिक अनैतिक जीवनाला वाहिलेले जाते, अशा दुदैवी मुलींच्या समाजातील स्थानाविषयी अधिक भाष्य करण्याची गरज नाही. खरे तर अशा प्रकारच्या प्रथेला मान्यता देणे, या प्रथेमुळे होणाऱ्या संबंधित मुलींच्या नुकसानभरपाईचा देखावा निर्माण करणे, त्यांच्या समाजातील असाधारण स्थानास

विशिष्ट सवलती देऊन अशा जीवनपध्दतीचे कायदेशीर नियमन करणे म्हणजे हा हिंदू कायद्यातील कलंकच आहे. कोणाही सुसंस्कृत राज्याकडून अशा प्रकारच्या स्त्रियांच्या स्थानाला जोडण्यात आलेल्या विशिष्ट हक्कांना संमती किंवा मान्यता मिळता कामा नये.

**सारांश**

छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांना अनेक प्रकारच्या प्रथा व परंपरांच्या कचाट्यातून मुक्त करण्यासाठी स्वतः कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली आहे. अन्यायी रुढी परंपरा व अत्याचार पुरुषी वर्चस्वाचे जुलूम यापासून स्त्रीवर्गाचे संरक्षण करण्यासाठीच महत्त्वपूर्ण असे कायदे केले. जोगतिणी, मुरळी स्त्रियांना जे देवस्थानचे विशिष्ट हक्क प्राप्त होत होते, तेच त्यांनी या कायद्याने नष्ट केले. असे केल्याने या कनिष्ठ जातीमध्ये देवाला मुली वाहण्याची जी अत्यंत घृणास्पद व क्रूर चाल रुढ झाली होती तिला आपोआपच आळा बसेल असा महाराजांचा विश्वास होता. तसेच छत्रपती शाहू महाराजांनी पुनर्विवाह नोंदणी, कायद्याने त्यांनी विधवांना पुनर्विवाहाची वाट मोकळी केली. ज्या कुणा स्त्रीस धाडसाने परधर्मीय अथवा परजातीय पुरुषाशी विवाह करावयाचा असेल तर तिचाही मार्ग त्यांनी निष्कंटक केला. १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला तिच्या निवडीच्या जोडीदाराबरोबर विवाह करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. कुटुंबातील पती, दीर, सासू अशा कुणाही व्यक्तीने स्त्रीवर केलेल्या अत्याचारांसाठी निरनिराळ्या शिक्षांची तरतूद करुन कौटुंबिक अत्याचारांना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. स्त्रीच्या विधिवत विवाहाप्रमाणेच विवाहबंधनातून मुक्त होणाऱ्या काडीमोड घटनेस कायदेशीर स्वरुप प्राप्त करुन दिले व शेवटी जोगतिणी प्रतिबंध करुन समाजाला कलंक लावणारी व स्त्रीजातीची भयंकर विटंबना करणारी रुढी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीमुक्तता करण्यासाठी शाहूंनी पुनर्विवाह नोंदणी कायदा, आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह कायदा, स्त्री अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा. घटस्फोटित कायदा आणि जोगतिणी- प्रतिबंध कायदा इत्यादी कायदे करून स्त्रीला दास्यमुक्तीतून मुक्त केले. परंतु त्याप्रमाणे समाजात सुधारणा झाल्या असे नाही. हे खरे पण त्यामुळे या कायद्यांचे महत्त्व आणि ते करण्यासाठी शाहू महाराजांनी उदात्त मानवतावादी दृष्टी कमी महत्त्वाची ठरत नाही. एका देशी राजाने आपल्या लहानशा संस्थानात इंग्रज सरकारकडून प्रगत असे कायदे करावेत, ही घटनाच मुळी हिंदुस्थानच्या सामाजिक इतिहासात क्रांतिकारी ठरणारी आहे.

**संदर्भग्रंथ**

१. संपा. प्रदिप गायकवाड, राजर्षी शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे, प्रकाशक, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर
२. डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, प्रकाशक, गुलाबराव मारुतीराव कारले, शुक्रवार पेठ पुणे
३. डी. आर. ओहोळ, राजातील माणूस आणि माणसातील राजा लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज, प्रकाशक, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट मुंढवा पुणे
४. य.एस.एस. भोसले, क्रांतिसुक्ते : राजर्षी छत्रपती शाहू. ८ जानेवारी १९९९ प्रकाशक
५. डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा, पहिली आवृत्ती २५ नोव्हेंबर २००४, सुरेश प्रकाशन, कोल्हापूर
६. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ
७. राजर्षी शाहू : एक दृष्टिक्षेप - डॉ. जससिंगराव पवार
८. राजर्षी शाहू महाराज धनंजय कीर १९७९
९. सो. वसुदा ज. पवार, राजर्षी शाहू महाराज एक मागोवा, प्रथमा आवृत्ती २५ नोव्हेंबर २००४
१०. संपा. प्रदिप गायकवाड, राजश्री शाहू महाराजांची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे, प्रकाशक, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर

समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी

महाराष्ट्रातील जनतेला राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचे ऋणानुबंध माहीत आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या हुशारी व बुद्धिमत्तेने महाराज दिपून गेले व त्यांनी डॉक्टरांशी अपार स्नेह केला. विख्यात लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी मिळवण्यासाठी जेव्हा डॉ. आंबेडकर यांच्याकडे पैसे नव्हते, तेव्हा उदार मनाने व अगदी सहजपणे महाराजांनी शिष्यवृत्ती दिली. परळच्या जय दबक चाळीमध्ये बाबासाहेब अनेक वर्षे राहत होते, तेथे मुद्दाम भेट देऊन 'अहो भीमराव, मी आलो आहे,' असे मोठ्याने म्हणून आपल्या मित्राला राजमान्यता देण्याचे महान कार्य महाराजांनी केले. 22 मार्च 1922 रोजी माणगाव येथे अखिल महाराष्ट्र अस्पृश्य समाजाची मोठी परिषद भरली होती. तिचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.

त्या परिषदेला महाराज उपस्थित होते. त्यानी डॉ. आंबेडकरांचा गौरव केलाच; परंतु 'आता तुम्हाला तुमचा पुढारी मिळाला आहे. तुम्हाला दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्याच्या मागून जाण्याची गरज नाही,' असे जाहीर आवाहन केले. महाराजांच्या मनाचा केवढा मोठेपणा! बहुजन समाजाप्रमाणे शिक्षण हाच स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा मार्ग असून, त्याद्वारेच त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होईल, यावर विश्वास असलेल्या महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. लहान वयात वैधव्य आलेल्या आपल्या सुनेला, इंदुमती राणीसाहेब यांच्या शिक्षणासाठी त्यांनी जे प्रयत्न केले, ते आजही कौतुकास्पद वाटण्यासारखे आहेत.

आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इ. सर्व क्षेत्रांत देशाने निखालसपणे प्रगती केली आहे. शैक्षणिक क्षेत्रापुरते बोलायचे झाल्यास जमेच्या अनेक बाजू आहेत. परंतु, स्वतंत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक गरजा ध्यानात घेऊन आपण एक सुसंगत शैक्षणिक धोरण निर्माण करू शकलो नाही.

राजर्षी शाहू महाराजांचा द्रष्टेपणा केवळ भारताच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासात अधोरेखित करण्यासारखा आहे. त्यांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून सशक्त केले. बहुजन समाजाप्रमाणेच महाराजांनी स्त्री शिक्षणासाठीही सर्वतोपरी प्रयत्न केले.

महात्मा जोतीराव फुले हे भारतातील पहिले समाजक्रांतिकारक होत. जोतीरावांचा ऐतिहासिक वारसा राजर्षी शाहू महाराजांनी जसाच्या तसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अलौकिक राज्य कारभाराने रयतेचा राजा अशी स्वत:ची जी सार्थ प्रतिमा निर्माण केली, तशीच प्रतिमा राजर्षी शाहू महाराजांनीही केली. मात्र, एक 'राजा' असूनही सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य ध्यानात घेतले, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर जोतीरावांचा प्रभाव दिसून येतो.

प्रस्थापित समाज व्यवस्थेतील धर्माचे, खरं म्हणजे अ-धर्माचे आधिपत्य, त्याच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आणि प्रामुख्याने 'पुरोहित' वर्गाने स्वत:च्या स्वार्थासाठी निर्माण केलेल्या अन्यायकारक रूढी व परंपरा यांच्या विरुद्ध जे कृतिशील बंड केले, त्यामागचे सामाजिक समता आणि न्याय हेच महाराजांच्या राज्यकारभाराचे वैचारिक अधिष्ठान राहिले. 1894 ते 1922 अशा 28 वर्षांच्या आपल्या राजकीय कारकिर्दीत कोल्हापूरसारख्या एका

छोट्याशा संस्थानाचा राज्यकारभार त्यांनी सर्वांगीण विकास आणि न्याय या दोन खांबांवर उभा केला. इथे आपण त्यांच्या मूलगामी शैक्षणिक कार्याचा आढावा घेणार आहोत.

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाईंनी ज्या अनेक क्रांतिकारक गोष्टी केल्या, त्यामध्ये शूद्र, अस्पृश्य आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी स्वतःला आयुष्यभर वाहून घेतले हे कार्य सर्वात महत्वाचे ठरते. जोतीरावांचा हा क्रांतिकारक शैक्षणिक, खरं म्हणजे सर्वांगीण वारसा शाहू महाराजांनी राजे असल्यामुळे आपले सर्व सामर्थ्य पणाला लावून पुढे चालवला. या शैक्षणिक कार्याच्या संदर्भात महाराजांवर त्यांच्या वडिलांनी सुरू केलेल्या शैक्षणिक कार्याच्या प्रभावाप्रमाणे ख्रिस्ती मिशनऱ्यांचा प्रभाव होता, हे कृतज्ञपणे नमूद करायला हवे.

27 डिसेंबर 1917 रोजी खामगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना, “मी माझ्या स्वत:च्या मंडळीमध्ये एक शेतकरी या नात्याने आलो आहे आणि त्यामुळे माझा आनंद द्विगुणीत झाला आहे,” असे नमूद करून महाराजांनी आपली शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, “शिक्षण हाच आमचा (म्हणजे बहुजन समाजाचा) तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी आणि वीर कधीच निपजत नाहीत. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानात अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाल म्हणजे इतिहासातील एक अघोरी रात्र आहे. फक्त एकाच जातीने शिक्षणाचा मक्ता घेतला. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचिले; आणि कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वत:चे धर्मग्रंथ आणि वेद हेसुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदू धर्माशिवाय इतर कोणत्याही धर्माने अशा आंधळ्या व दु:खकारक परिणाम करण्याबद्दल प्रमुखता मिळवली नाही.”

शिक्षणाचा अधिकारच नाकारला गेल्यामुळे सर्वच बाबतीत अधू, लुळ्यापांगळ्या झालेल्या समाजाला आर्थिक व सामाजिक पातळीवर सक्षम करण्यासाठी ‘शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही’ असे जरी महाराज म्हणाले, तरी त्याची एक दुसरी अत्यंत महत्त्वाची बाजू होती. ती म्हणजे, शिक्षणाची मक्तेदारी असल्यामुळे ब्रिटिश राजवटीमध्ये सर्‌व नोकरशाही संख्येने अल्प असलेल्या ब्राह्मण समाजाच्या हातात केंद्रित झाली होती. कोल्हापूर संस्थान त्याला अपवाद नव्हते. 1890 च्या दरम्यान कोल्हापूर संस्थानाची एकूण लोकसंख्या नऊ लाख होती. त्यापैकी फक्त 26 हजार ब्राह्मण होते.

1881 मध्ये कोल्हापूर संस्थानात समाजनिहाय साक्षरतेचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते : ब्राह्मण – 79 टक्के, जैन व लिंगायत – 10.6 टक्के, मराठा – 8.6 टक्के, मुस्लिम – 7.5 टक्के, आणि कुणबी – 1.6 टक्के. त्यादरम्यान कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व 441 विद्यार्थ्यांमध्ये 368 ब्राह्मण, तर राजाराम कॉलेजमध्ये 61 विद्यार्थ्यांपैकी 55 विद्यार्थी ब्राह्मण समाजाचे होते. स्वाभाविकपणे, त्याच दरम्यान कोल्हापूरच्या नोकरशाहीमध्ये ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या 60 टक्के होती, तर ब्राह्मणेतर अधिकाऱ्यांची संख्या केवळ 11 टक्के होती. महाराजांच्या खासगी सेवेतही 46 ब्राह्मण, तर केवळ 7 ब्राह्मणेतर होते.

प्रशासकीय सेवेतील अशा भयानक विषमतेच्या अनेक दाहक परिणामांपैकी एक परिणाम असा झाला, ब्राह्मणेतर समाजाला ब्रिटिश सरकारकडे अथवा खुद्द महाराजांच्या दरबारात काही तक्रार वा कैफियत मांडायची असल्यास ब्राह्मण नोकरशाही ती सरकारपर्यंत पोहचू देत नसत. या पार्श्वभूमीवर महाराजांना प्रशासकीय सेवेतील

ब्राह्मण समाजाची मक्तेदारी मोडून समाजातील सर्व घटकांना योग्य ते प्रतिनिधित्व असलेली सर्वसमावेशक प्रशासकीय व्यवस्था हवी होती. महाराजांच्या अलौकिक शैक्षणिक कार्याचे हे एक सामाजिक अधिष्ठान व उद्दिष्ट होते. महाराजांनी 30 सप्टेंबर 1917 रोजी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी केला.

या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून बहुजन समाजाला सशक्त करण्यासाठी महाराजांनी ज्या तरतुदी केल्या, जे तपशीलवार नियम केले, ते पाहिले की थक्क व्हायला होते. उदा. शिक्षणास योग्य असलेली मुले म्हणजे वयाच्या सातव्या वर्षांपासून चौदा वर्षांपर्यंतची मुले. मुलांना शाळेत धाडण्याची संपूर्ण जबाबदारी आईबापांची असेल. शाळा या शब्दाचा अर्थ – सरकारी शाळा, सरकारने मदत दिलेली अथवा कोणतीही शाळा, अथवा राज्याच्या शिक्षण खात्याने वेळोवेळी परवानगी दिलेली कोणतीही शिक्षण संस्था इत्यादी. या संदर्भात नमूद करण्याजोगी बाब म्हणजे त्यावेळी तेल्या-तांबोळयांचे पुढारी म्हटले गेलेल्या लोकमान्य टिळकांनी या कायद्याला जाहीरपणे विरोध केला होता.

भारताला 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि 26 जानेवारी 1950 रोजी स्वतंत्र भारताची जगप्रसिद्ध राज्यघटना मान्य करण्यात आली. परंतु अशा राज्यघटनेतही 14 वर्षांपर्यंतच्या मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची तरतूद मूलभूत अधिकारांमध्ये न करता मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करण्यात आली. आणि त्याप्रकारचा कायदा तर घटना-दुरुस्ती करून 2010 मध्ये करण्यात आला. म्हणजे कोल्हापूरसारख्या एका अतिशय छोट्या संस्थानाचा लोकाभिमुख राजा जगातील सर्वात मोठ्या प्रजासत्ताक लोकशाही देशाशी तुलना करता सुमारे नऊ दशके अगोदर एक समाज-क्रांतिकारक कायदा कृतीमध्ये आणतो, हा शाहू महाराजांचा द्रष्टेपणा केवळ भारताच्या नव्हे, तर जगाच्या इतिहासात अधोरेखित करण्यासारखा आहे.

1896 मध्ये कोल्हापूर संस्थानात एकूण 27 प्राथमिक शाळा होत्या आणि 1296 विद्यार्थी शिकत होते. 1922 मध्ये प्राथमिक शाळांची संख्या 420 झाली आणि विद्यार्थ्यांची संख्या 22,000 वर गेली. केवढी प्रचंड झेप!

महाराजांनी केलेली ही सामाजिक-शैक्षणिक क्रांती होती. महाराजांच्या शैक्षणिक क्रांतीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या संस्थानात शाळा-कॉलेज यांच्यासोबत वासतिगृहांची मोहीमच उघडली. त्यामुळे समाजाच्या गरीब घटकातील मुलांना शिक्षण घेणे सोपे झाले. याचा परिणाम अर्थातच कोल्हापूर संस्थानात शिक्षण क्षेत्रातील ब्राह्मण समाजाची मक्तेदारी कमी झाली. उदा. राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेजमध्ये 1894 मध्ये ब्राह्मण विद्यार्थ्यांचे प्रमाण 90 टक्के होते, ते 1922 मध्ये 48 टक्क्यांवर आले; तर ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांचे प्रमाण दहा टक्क्यांवरून 51 टक्क्यांवर गेले.

# बळीराजाचा राजा छत्रपती शाहू महाराज.

सहा. प्रा. मनोज आर. पवार
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्याल,हाडोळती.

**प्रस्तावना:-**

आज शेतकरी म्हणजे जो कसतो व ज्यांच्या नावे शेती आहे, तो शेतकरी. असा त्यांचा अर्थ सांगता येईल. परंतु त्यांच्या आज अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढते कर्जबाजारी पणा, हमीभाव मिळण्यात अडचणी, सरकारची अस्थिर धोरण, तोट्यातील शेती, शेतकऱ्यांना लुटणारी माणसे, निसर्गच्या लहरीपणा मुळे होणारे मोठे नुकसान इत्यादी समस्या पहावयास मिळतात. कोल्हापूरच्या समृद्धीचे जनक छत्रपती शाहू महाराज यांनी शेती विषयक धोरण व कार्य केले आहे, ते खरोखरच चांगले आहे. त्यांचा पुर्नर अभ्यास करण्यासारखा देशाचा उद्धार हे सूत्र अध्ययनात घेऊन छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या आहेत. त्याला जोड म्हणून नवनवीन उद्योग धंदे सुरू केले. आणि या उद्योगधंद्यांना सहकार तत्वाची ऊर्जा आहे. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तेव्हा शेतीचा उद्धार म्हणजे, शेतकऱ्यांचा उद्धार. पर्यायाने ऊर्जा दिली. सहकार व उद्योगधंदे या तिन्ही क्षेत्रात आघाडी दिसते. कोल्हापूर संस्थानाच्या या प्रगतीचा पाया 100 वर्षांपूर्वी शाहू महाराजांनी घातला.

**1) पाटबंधारे धोरण:-**

छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानासाठी अपूर्व असे सार्वत्रिक पाटबंधारे धरण जाहीर केले. त्यासाठी त्यांनी खास 'इरिगेशन ऑफिसरची' नेमणूक केली. या खात्या मार्फत संस्थानाच्या प्रत्येक गावाची पाटबंधारेच्या दृष्टीने तपशीलवार पाहणी करण्यात आली. जुन्या, नव्या विहिरीत, छोट्या मोठे तलाव, लहान मोठे बांधारे या सर्वांच्या नोंदी करून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. नवीन विहिरी, बंधारे यांना मंजुरी दिली. त्याच बरोबर त्यांनी छोटे तलाव, धरण बांधणीला सुरुवात करून राधानगरी हे मोठे धरण बांधले व देशापुढे व जगासमोर नवीन आदर्श घालून दिले. आज ही शेतकऱ्यांच्या मनात 'राधानगरी' धरणाबद्दल अभिमान वाटतो.

**2) शेतकी शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज:-**

शाहू महाराजांनी शेतकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले होते. त्यासंबंधीच्या ठरावा बाबत महाराज म्हणतात ठराव क्रमांक 980 अव्वल रामबाण दिवाणी सरकार करवी मंत्री करी रामचंद्र धोंडो शेळके रा. कोल्हापूर हे मराठी ग्राह्य अग्रिकल्चर शिकण्याकरिता अमेरिकेस जाणार असल्याने त्यांनी समक्ष विनंती करून त्यास त्या काळातील पंधराशे रुपये बिनव्याजी कर्जाऊ खात्याची मालकीची तसलमान देण्यात यावी.

**3) शेती विषयक व्यापार:-**

शाहू महाराजांनी शेती पूर्वक उद्योगधंद्या बरोबर शेती विषयक व्यापाराला सुद्धा चालना दिली आहे. आम्ही शेतकरी किंवा शेतकीय होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधान कारक नाही. म्हणून व्यापार धंदे व इतर उच्च प्राप्तीचे व्यवसाय यात आम्हास शेतकऱ्यांची जरुरी आहे. शेतीच्या व्यवसायामध्ये जरी समाजातील बहुतेक लोक गुंतले आहेत, त्यासाठी त्यांना सुद्धा शिक्षणाची आम्हाला जरुरी आहे.

4) **शेती प्रदर्शने:-**

शाहू महाराजांनी त्याकाळी आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात अंबाबाईचा रथावर, ज्योतिबा यात्रा अशा ठीकठिकाणी शेतकी प्रदर्शनी भरवली. या प्रदर्शनात उत्तम उत्पादनाच्या धाग्याची नमुने, माहिती पुस्तके, उत्तम जनावरांची प्रदर्शने, चांगला गुळ राजापुरी गुळ हा त्याकाळी प्रसिद्ध होता. तो गुळ मुंबईच्या बाजारपेठेत पाठवला जाईल.

### 5) आधुनिक अवजारे विषयक धोरण

शेतीविषयक लागणारे अवजारे बनवणारे शाहू महाराज हे पहिला राजा होय. शेतकऱ्यांना पोलादी नांगर बनवण्यास किर्लोस्कर कंपनीला दिला. या कंपनीला लोखंड उपलब्ध करून दिले. हजारो वर्ष दूरदृष्टी ठेवून कार्य करणारा राजा आहे. त्यांनी पारंपारिक शेतीला फाटा देऊन आधुनिक पद्धतीने शेती कशी करता येईल असे धोरण त्यांनी राबविले.

### 6) जोडधंदा विषयक धोरण

शेतीला जोडधंदा म्हणून मधमाशी पालन करावे असे महाराज सांगायचे, हा उद्योग संस्थानातील पश्चिम भागातील सह्याद्रीच्या डोंगर गावाकडील वनश्री बालिका, फुलाफळांनी नटलेली होती. त्यामुळे संस्थानात शेतीला जोडधंदा म्हणून मधमाशी उद्योगधंद्याला ही त्यांनी आपल्या संस्थानात प्रस्तावित केली. तसेच सूत गिरणी काम याच बरोबर कापड उद्योगालाही त्यांनी आपल्या संस्थानात प्रोसाहित केले. त्याचा बरोबर साकार कारखाने सुध्दा काढले.

### 7) नवीन पिकांचा प्रयोग

छत्रपती शाहू महाराज स्वतः जातीने लक्ष घालून त्यांनी रेशीम बेलदोड, कोको इंडियन रबर, ताग अंबाळी, वेळ गावी बटाटे, लाख शिंगाडे, टोपीओका, शाहू कंबोडियन कापूर, इत्यादी अनेक पिकांची लागवड व प्रक्रिया करण्याची नवनवीन प्रयोग त्यांनी केले. त्याच बरोबर पन्हाळयाजवळ त्यांनी कॉफी व चहाची लागवड केली या मळयातील चहा त्यावेळी पन्हाळा या ब्रँडने विकला जात होता.

### 8) गट शेती

शाहू महाराजांच्या काळात शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन झाले होते. वाटणी व्यवहाराने अशा लहान तुकड्याची निर्मिती झाली होती. ती बदलावी आणि त्यांचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता. म्हणजे शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्यांची प्रगती होईल. असे त्यांचे स्पष्ट मत होते हे मत त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवले. माणगावच्या परिषदेत भाषण करताना ते म्हणाले तुम्हा सुधारणटा मानसी 10 एकर जमीन वाट्याला येईल असे तुमच्या हक्काचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्यातील वडील माणसांच्या व्यक्तीकडे चालवायला द्या म्हणजे सर्वांना अर्धपोटी राहावे लागते ते वाचेल त्यासाठी त्यांनी अविभाजनाचा कायदा केला. त्यामध्ये वाटणी करता येणार नाही. असे ठरविले त्यातून त्यांची श्रमाला क्षमाला महत्त्व देऊन अन्नाला ही महत्त्व दिले.

**संदर्भ ग्रंथ:-**


1) दैनिक लोकमत 26 जून 2020.
2) राजर्षी शाहू गौरव, संपादक डॉ. जयसिंग पवार.
3) राजर्षी शाहू गौरवग्रंथ, संपादक डॉ. रमेश जाधव

# महिला सबलीकरणात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

कांबळे दत्ता दौलाजी
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना:**

इतिहासाचा कालखंड कोणताही असो कोणत्याही कालखंडात स्त्रिया मोठ्या प्रमाणात छळाच्याबळी ठरलेल्या दिसतात. त्यात पाच हजार वर्षापासून चालत आलेली हिंदू धर्मातील मनुस्मृति मनुस्मृतीच्या मातीने वर्णव्यवस्थेला जन्मास घातले. वर्णव्यवस्थेने जातीच्या गोंडस पिल्लांना जन्मास घातले आणि आज जातीच्या पाच हजाराहून अधिक भिंती निर्माण झालेल्या आहेत, याचा अर्थ जातीच्या या गोंडस पिल्लाने अधिक बाळसे धरलेले आहे म्हणजेच आपण सर्वजण माणूस असून वर्णव्यवस्थेने आणि जाती व्यवस्थेने मानवा मानवात विविधीकरण, विषमतावादी समाजरचना, धार्मिक भेद स्त्रिया बरोबरच स्त्री-पुरुषात देखील मोठ्या प्रमाणात लिंगभेद निर्माण केलेला आहे. हिंदू धर्मानुसार आजही मुलगा वंशाचा दिवा ठरतो तो जन्माला आल्यानंतर पेढा दिला जातो.पेढा हा शब्द पुल्लिंग आहे तर मुलगी जन्मानंतर जिलेबी वाटली जाते. जिलेबी हा शब्दस्त्रीलिंगी आहे,यावरूनभारतीय समाजाची मानसिकता पुरुषप्रधान असलेली दिसते.अशा या विषमतेचे साकळ दंड तोडणारे कर्ते समाजसुधारक महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर' म्हणून महात्मा फुले यांचा आपणास उल्लेख करावा लागतो. ज्यांनी स्वतःबरोबर स्वतःच्या पत्नीला शिकवून सवरुन माणूस बनवून समानतेचा दर्जा देऊन उभे आयुष्य तळागाळातील. बहुजनांच्या व त्याचबरोबर स्त्रियांच्या उद्धारासाठी खर्च केले "बोले तैसा चाले त्याची वंदावी पावली" अशा प्रकारचे फुले दांपत्य होते. त्यांना समाज रोशाचे अनेक लढे लढावे लागले सनातनी समाजाला विरोध करून दंड थोपटून प्रवाहाच्या विरुद्ध उभे राहावे लागले. प्रसंगी घरदार सोडण्याची वेळ आली अनेक बेतांचे प्रसंग आले, तरी त्यांनी न डगमगता घेतला वसा सोडला नाही. समाजकार्य सोडली नाही. या विषमतेच्या समाजाला झगडत आपले आयुष्य चंदनासारखी झिजवलेमहात्मा फुले सावित्रीबाई फुले यांनी मुलीच्या शाळा काढल्या आणि स्त्री शिक्षणाचा पाया प्रथम महाराष्ट्रामध्ये रोवला या लावलेल्या रोपट्याला खतपाणी घालून कुंपण करून संगोपन करून वाढवण्याचे कार्य लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात केले म्हणूनच आज सरपंच पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत जाऊन विराजमान झालेल्या स्त्रिया एका काळी विहिरीच्या दोर ओढणाऱ्या स्त्रिया होत्या त्या आज स्त्रियांच्या प्रशासनाची दोरसक्षमतेने दोर ओडत आहेतयावरून छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री सबलीकरणात स्त्रियांच्या उद्धारासाठी, स्त्री आरक्षणासाठी स्त्रियांच्या स्वावलंबनासाठी केलेले कार्य अनमोल स्वरूपाचे ठरते, त्यांनी केलेल्या कार्याचा आपण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

**स्त्री शिक्षणाचा आरंभ काळ:-**

राजश्री शाहू महाराजांचा कार्यकाळ हा भारतातील स्त्री शिक्षणाचा आरंभ कालखंडच होता नुकतेच स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली होती. सामाजिक सुधारणेची मागणी व आग्रह होत होता. नव विचारांची निर्मिती होत होती. भारतात ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज यांनी स्त्री शिक्षण व स्त्री सुधारणा चालना दिली होती यावरून हे स्पष्ट होती की, महात्मा फुलेंची 1848 ची मुलींची शाळा 1849 ची कलकत्ता च्या बेंथम ची इंग्रजी मुलींची शाळा 1893 महाकाली पाठशाला कलकत्ता,1892 ची जालंदरचे लाला देवराव यांची कन्या विद्यालय 1896 ची महर्षी कर्वे यांची विधवा महिलांचे आश्रम हे सर्वच स्त्री शिक्षणाचे भारतातील आरंभ चे प्रयत्न होते. म्हणजेच 1850 ते 1915 या दरम्यान स्त्री शिक्षणाचे भारतात प्रारंभीचे प्रयत्न होण्याचाच कालखंड होता नेमक्या याच काळात राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रियांच्या शिक्षणाचे व सबलीकरणाचे अनेक प्रयत्न केले हे फार महत्वाचे आहे.

**तत्कालीन स्त्रियांची सामाजिक स्थिती:-**

राजश्री शाहू च्या काळात स्त्रियांना भेडसावणाऱ्या अनेक समस्या मध्ये सती प्रथा बालविवाह प्रथा, देवदासी प्रथा, बहुपत्नी प्रथा, केशव पण प्रथा, विजोड विवाह स्त्री शिक्षणावर बंदी अशा अनेक प्रथा परंपरेने स्त्री

जीवनाला बंदिस्त करण्यात आलेले होते. अशा बिकट परिस्थितीत शाहू महाराजांनी सामाजिक स्थितीचे अवलोकन केले बहुजना बरोबर स्त्रिया ही मोठ्या प्रमाणात शिक्षणापासून सामाजिक दर्जापासून मानपानापासून वंचित स्वरूपाच्या होत्या स्त्रियांना समाजात माणूस म्हणून अधिकार प्राप्त करून देण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी कोणतीही शस्त्र नाही, कारण महात्मा फुलेंनी सांगितलेले विचार म्हणजे “विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना वित्त गेले वित्तविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले” महाराजांनी आत्मसात केलेला होता. म्हणून महात्मा फुलेच्या स्त्री जीवनाच्या कार्याला नव्याने गतिमान करण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणाचा जागर सुरू केला. यावरून तत्कालीन भारतीय व महाराष्ट्रातील स्त्रियांच्या औनत अवस्थेची स्वरूप स्पष्ट जाणवते.

**स्त्री सबलीकरणात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान:**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या मागासलेल्या समाजाप्रमाणे स्त्री सबलीकरणाचे कार्यही मौलिककेले आहे. कोणत्याही मानव समूहाची उन्नती साधायची असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असे राजर्षी शाहू महाराजांनी मानून त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणाची घोषणा खामगाव शिक्षण परिषदेत केली. म्हणून शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास झालेला नाही. हे त्यांच्या विचारधारेतून स्पष्ट होते. निरीक्षरता व अज्ञानरूपी अंधारातून वर जायचे असेल तर समाजाचा, देशाचा विकास साधायचा असेल तर स्त्रियांना शिक्षण देणे हा मूलमंत्र राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात रुजविला स्त्री जीवनाला अनुकूल वातावरण केले, यावरून राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्री शिक्षणासाठी महत्त्वाचे प्रयत्न केले हे मान्य करावे लागते.

**स्त्री शिक्षणासाठी उपाययोजना:-**

पृथ्वीतलावर पुरुष आणि स्त्री या दोनच मानव जातीआहेत. त्यामुळे दोघांनाही समान हक्क अधिकार असावे लागतात. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांनाहीन, दुर्बल मानून तिला शिक्षणापासून वंचित ठेवले होते, अशा या वंचित उपेक्षित समाजाचा विरोध असणाऱ्या विषयात लक्ष घालण्याची राजर्षी शाहू महाराजांची कार्य म्हणजे संस्कृतपणे स्वतःच्या अंगावर हे लोकांना निमंत्रण करण्यासारखेच होती स्त्री शिक्षणासाठी जातीने पुढाकार घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या स्त्री सक्षमीकरणाच्या योजना लक्षवेधी आहेत. आजच्या परिस्थितीतही स्त्री शिक्षणाच्या उत्तेजनासाठी त्या दिशादर्शक ठरलेल्या आहेत.

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा:-**

राजर्षी शाहू महाराजांनी 21 सप्टेंबर 2017 रोजी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला. त्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण केले. आई-वडिलांनी आपल्या पाल्यास शिक्षण देणे. मुलांना शाळेत पाठवणे. बंधनकारक केले. व न पाठवल्यास दंडाची तरतूद केली व आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षणासाठी एक लाख रुपयाचा निधी मंजूर केला. त्याच पद्धतीने श्रीमंत वर्गास जास्तीच्या प्रमाणात कर लावला. देवस्थान समितीच्या उत्पन्नातील 20% उत्पन्न घेतले. आमच्या सर्व प्रजाजनाला वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास त्यांनी समर्थ व्हावे या उद्देशाने हा कायदा लागू केला. 500 ते 1000 लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन केल्या. एक वर्षात 96 शाळा स्थापन केल्या दिवसेंदिवसशाळेच्या संख्येत व विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली. देशातील हा मुलींच्या शैक्षणिक सक्षमीकरणाचा पहिला सक्तीचा कायदा लागू करून राजर्षी शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता निर्मिती करण्याचा पुरोगामी विचारसरणीचा पाया रचला.

**मुलींच्या शिक्षणास विशेष प्रयत्न:-**

राजर्षीशाहू महाराजांनी मुलीच्या शिक्षणास विशेष प्रयत्न केले. त्यानुसार ‘मिस लिटल’ या शिक्षण अधिकाऱ्याने इंग्रज बाई स्वदेशात गेल्यानंतर त्यांच्या जागी रखमाबाई केळकर या अतिशय बुद्धिमान महिला शिक्षिकेची लेडीज सुप्रीटेंड म्हणजेच शिक्षणअधिकारी या पदावर त्यांची नेमणूक केली. व तसेच त्यांनी फॅमिली ट्रेनिंग स्कूल ची स्थापना करून समाजातील गोरगरीब मुलीसाठी स्वतंत्र शाळा स्थापन केल्या. अल्पावधीतच म्हणजे अगदी चार ते पाच वर्षात भुदरगड सारख्या सह्याद्री लगतच्या मागासलेल्या भागातही त्यांनी मुलीची शाळा सुरू केली. मुलींनी मुलांच्या बरोबर शिक्षण घ्यावे याकरिता उत्तेजन म्हणून महाराजांनी ज्या शाळेमध्ये मुली उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त आहे, त्या शाळेतील शिक्षकांना बक्षीस देण्याची योजना सुरू केली. तसेच चौथीपर्यंत

सर्वाधिक गुण घेणाऱ्या मुलांना शिष्यवृत्ती ठेवल्या डॉ. राधाकृष्णबाई यांना प्रदेशात वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी पाठवून बहुजन समाजाच्या सेवेसाठी कोल्हापूरच्या सरकारी दवाखान्यात त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी दिली. तसेच 1919 मध्ये जाहीरनामा काढून त्यांनी स्त्रियांसाठी लॉजिंग बोर्डिंग ची मोफत सोय केली.

**उच्च शिक्षणाची मोफत सोय:-**

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर आतील राजाराम कॉलेजमध्ये मुलींना सामाजिक आर्थिक अडचणीवर मात करता यावी म्हणून मुलींना उच्च शिक्षण मोफत केले आजही आपल्या लोकशाही व कल्याणकारी शासनास सर्वच मुलींना उच्च शिक्षण देण्याची राजकीय इच्छाशक्ती होत नाही याबाबतीत महाराजांची कार्य अधिक महत्त्वपूर्ण वाटते शाहू महाराजांचे हे अंतरिक तळमळीचे कार्य कृतिशील प्रयत्न संस्थानातील स्त्रियांच्या शैक्षणिक सबलीकरणासाठी स्त्री शिक्षणाच्या इतिहासात अधिक महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे दिसते.

**स्त्री उन्नतीचे पुरोगामी कायदे.:-**

शाहू महाराजांनी स्त्रियांना उच्च शिक्षणाचे जसे कायदे केले.तसेच त्यांना आर्थिक संरक्षण देणारे स्त्रियांचे रक्षण करणारे धक्कादायक वाटावे असे कडक कायदे केले. तसेच समाजाकडून आणि कुटुंबाकडून होणाऱ्या पिळवणुकीला कडवा विरोध केला एकंदरीत स्त्रीमुक्ती चळवळीस महाराजांनी हातभार लावला.

**विधवा पुनर्विवाह व आंतरजातीय विवाह कायदा:-**

साथीच्या रोगात मृत्यू पावणाऱ्या चे प्रमाण त्यावेळी जास्त असल्याने कमी वयातच स्त्रिया विधवा होत असत. त्यामधून अनेक सामाजिक प्रश्न उभे राहत तेव्हा महाराजांनी 1917 ला विधवा विवाह पुनर्विवाहाचा कायदा करून स्त्रियांना फार मोठा कायदेशीर अधिकार दिला.18 वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहसाठी तिच्या पित्याची सहमती असणार नाही. म्हणजेच जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य देणारे वैशिष्ट्यपूर्ण कलम या कायद्यात होते. त्यामुळे महिलांना आंतरजातीय विवाह करण्यास स्वातंत्र्य मिळाले

**पडदा पद्धतीचे उच्चाटन:-**

उच्च मराठा व मुस्लिम वर्गामध्ये पडदा पद्धत होती. या पद्धतीमुळे स्त्रियांच्या मनातील भाव भावना शूरता तसेच अनेक गुणांचा नाश होतो. अशी राजर्षी शाहू महाराजांची भावना होती. राजमाता जिजाऊ, ताराबाई, अहिल्याबाई यांची उदाहरणे देऊन स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे त्यांच्या कृतुत्वाचा विकास करता येतो हे पटवून देऊन पडदा पद्धतीचे उच्चाटन केले.

**विवाह वय वाढीव कायदा व संमती:-**

शाहू महाराज लोकहिताचे निर्णय घेणारे कर्तेसुधारक होते कायदेमंडळाने 1891साली विवाह वयाची मर्यादा संबंधी बिल पास करून वधूचे वय बारा असावे असे निर्बंध घातले. तेव्हा या कायद्याविरुद्ध अनेक पुढाऱ्याने विरोध केला. महाराजांनी अठरा वर्ष वरील स्त्रीला पालकांची सहमती न घेता विवाह करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. त्यावेळी सात ते आठ वर्षाच्या मुलीचा विवाह होत असे, ती जुनी रुढी मोडून महाराजांनी विवाहाचे वय 14 वर्ष केले. त्यामुळे शाहू महाराज स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य देणारे महान सुधारक ठरतात.

आज छत्रपती शाहू महाराज यांच्या महिला सबलीकरणाच्या धोरणामुळेच स्त्री सक्षमीकरणाच्या विविध कायद्यामुळे आजची स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात दोन हात पुढचे पाऊल टाकताना चे दिसून येत आहे. मग ते शिक्षणासो की गुणवत्ता, समाजकारण असो की राजकारण, त्याचबरोबर साहित्य संशोधन, लेखन, चित्रकार ,पत्रकार ,कथाकार ,समीक्षक ,क्रीडा अशा विविध क्षेत्रात पुरुषाबरोबरच स्त्रियांच्याही कर्तृत्वाचा स्वतंत्र असा ठसा उमटलेला आहे. त्यामुळे आज कुठल्याही क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करून देत आहेत. उदा. इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील ,अंजली भागवत, पी. टी. उषा , मेधा पाटकर यासारख्या अनेक महिला जे कर्तृत्व करू शकल्या आणि करत आहेत यांचे योगदान राजर्षी शाहू महाराज यांनाच द्यावे लागते. इतिहासाच्या कालखंडातील आपले असणारे संपूर्ण राजवैभव, संपत्ती हे केवळ प्रजेच्या हितासाठी खर्च करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित करणारा राजा सापडणे कठीण आहे, यावरून महिला सबलीकरणात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान किती महत्त्वपूर्ण स्वरूपाचे आहे हे त्यांनी केलेल्या कृतिशील कार्यातून आपणास दिसून येते.

**संदर्भग्रंथ.**

1) समाजशास्त्र विचारांचे आधार, डॉ. दादासाहेब उत्तमराव मोटे.

2) महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, शुभांगी गोटे गव्हाणे.

3) रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज डॉ. आर. एस. कोंडेकर.